ई/१५५१

# भरतपुरचा वेढा.

किंमत ५ आणे.

इ-११४

Received 1st January 1907.
Register no 22/B of 1906/7.

# भरतपुरचा वेढा.

ई/१५१

हें पुस्तक

जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर,

यांनीं लिहिलें.

तें,

त्याच्या सर्व हक्कांसह विकत घेऊन,

मुंबईंत

तुकाराम जावजी

ह्यानीं आपल्या निर्णयसागर छापखान्यांत

छापिलें.

---

सन १९०५.

---

किंमत ५ आणे.

सन १८६७ च्या २५ व्या कायद्याप्रमाणें नोंदून यासंबंधी सर्व हक्क प्रकाशकानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

रै/१५१

# प्रास्ताविक दोन शब्द.

आमच्या भरतखंडांत, शौर्यधैर्यादि युद्धोपयोगी गुणांसंबंधानें जे लोक फार प्रसिद्ध आहेत, त्यांमध्यें राजपुतान्यांतील जाट लोकांचीही इतिहासकारांनीं प्रमुखत्वानें गणना केलेली आहे. इसवी सनाच्या एकोणिसाव्या शतकांत, भरतपुरच्या जाट राजांशीं इंग्रजांच्या ज्या लढाया झाल्या त्यांचा वृत्तांत फार मनोरंजक आहे. परंतु त्या संबंधाची विस्तृत माहिती ज्यांत दिलेली आहे, असें एकही पुस्तक मराठी भाषेंत अद्याप झालेलें नसल्यामुळें, कांहीं इंग्रजी व हिंदी ग्रंथांच्या आधारानें, मीं हें लहानसें पुस्तक लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न कितपत सफल झाला आहे, हें ठरविण्याचें काम इतिहासप्रिय व इतिहासज्ञ गृहस्थांचें आहे; तें ते सहृदयपणानें बजावितील, अशी जी माझी आशा आहे, ती परमेश्वर पूर्ण करो.

कोल्हापुर,
८-११-१९०४. } **जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर.**

## प्रकाशकांची सूचना.

ग्रंथाच्या हस्तलिखित प्रतींत शुद्ध लिहिण्याच्या संबंधानें, वाक्यरचनेच्या संबंधानें, आणि वर्णनपद्धतीच्या संबंधानें जे फेरफार आह्मांस आवश्यक वाटले, ते, कथानक मूळाप्रमाणें कायम ठेवून, केले आहेत. ह्याविषयीं ग्रंथकारांची संमति आह्मीं आधींच मिळविली आहे.

मुंबई,<br>ता० २० एप्रील, १९०५. } तुकाराम जावजी,<br>निर्णयसागर छापखान्याचे मालक.

# भरतपुरचा वेढा.

## प्रकरण पहिलें.

भरतपुर हें प्रसिद्ध संस्थान राजपुतान्यांत असून त्याची लांबी ७६ मैल व रुंदी ६२ मैल आहे. त्याचे उत्तरेस गुरगांव जिल्हा, पूर्वेस मथुरा आणि आग्रा हे जिल्हे व पश्चिमेस व दक्षिणेस धोलपुर, जयपुर व अलवार हीं रजपूत संस्थानें असून त्याचें एकंदर उत्पन्न सुमारें तीस लक्षांचें आहे. लोक शूर असून काटक आहेत. संस्थानाचा राजा जाट रजपूत असून, राजपुतान्याचा पोलिटिकल एजंट त्याजवर देखरेख ठेवितो. राजधानीचें शहर भरतपुर हें राजपुतान्यांतील मोठ्या व इतिहासप्रसिद्ध शहरांपैकीं एक असून त्याची लोकसंख्या सुमारें ७५,००० आहे. भरतपुरच्या राज्यांतील अत्यंत प्रेक्षणीय स्थळ ह्मटलें ह्मणजे भरतपुर शहराचा दुर्भेद्य तट, हें होय. हा प्रचंड तट, इ० स० १७७३ त, महाराणा बदनसिंह यानें बांधविला. आमच्या देशास भारतवर्ष किंवा भरतखंड हें नांव पडण्यास जें कारण झालें, त्याच कारणानें या शहरास भरतपुर हें नांव मिळालें आहे, असें डॉ० हंटर यांनीं आपल्या पुस्तकांत लिहिलें आहे.

भरतपुरचा राजवंश जाटजातीय असून प्रजाजनही बहुतेक त्याच जातीचे आहेत. शिवाय कांहीं मुसलमान व जैनही आहेत. 'जाट' शब्दाच्या उत्पत्तीसंबंधानें, त्या देशांतील लोकांकडून अनेक दंतकथा सांगण्यांत येतात. कोणी ह्मणतो,

'महादेवाच्या जटेपासून उत्पन्न झाले ते जाट होत'! कोणी ह्मणतो, 'जाट हे यदुवंशीय आहेत.' प्रसिद्ध इतिहासकार कर्नल टॉड व विल्सन साहेब यांचेंही असेंच मत आहे. कोणी ह्मणतात कीं जाट लोक चंद्रवंशी आहेत व दुसऱ्या कोणाचें मत असें आहे कीं, ते सूर्यवंशी आहेत! कोणी त्यांना रजपूत ह्मणतात. याशिवाय, त्यांच्या संबंधानें एक चमत्कारिक दंतकथाही प्रचारांत आहे. 'एके दिवशीं एक गुर्जर जातीची स्त्री डोईवर पाण्यानें भरलेली कळशी घेऊन रस्त्यानें चालली होती, इतक्यांत एक मोठा पुष्ट रेडा बेफाम होऊन तिकडून धांवत आला. त्या स्त्रीच्या डोईवर एवढें भारी ओझें असतांही तिनें त्या पळणाऱ्या रेड्याच्या गळ्यांतील दोर इतक्या जोरानें ओढून धरिला कीं, त्यास एक पाऊलही पुढें टाकतां येईना! हा विलक्षण प्रकार, तिकडून एक रजपूत राजा घोड्यावर बसून चालला होता, त्याच्या दृष्टीस पडतांच, त्या स्त्रीच्या अलौकिक शरीरसामर्थ्याचें त्यास मोठें आश्चर्य वाटलें. त्या स्त्रीसंबंधानें त्याचा ग्रह इतका चांगला झाला कीं, त्यानें शेवटीं तिच्याशीं आपला विवाह केला. त्या स्त्रीपासून राजास जी संतति झाली, तेच हे जाट लोक होत.' ही जात फक्त भरतपुरांतच आहे असें नाहीं, तर दिल्ली, रोहिलखंड, सिंध इत्यादि प्रांतांतही हे लोक आढळतात. या लोकांच्या 'पाचादी' आणि 'हिली' अशा दोन पोटजाति असून त्यांपैकीं 'पाचादी' जातीसंबंधानें, ह्मातारे पंजाबी लोक, थट्टेच्या प्रसंगीं, खालील कवितांचा उपयोग करितातः—

**'बूढी भैंस, पुराना गाडा ।**
**काला सांप और सगा पछादा ।**
**कुछ लाभ हुवा तो हुवा न खादर खादा ॥'**

कांहीं लोक असें सांगतात कीं, जाटांचा व रजपुतांचा विवाहसंबंध होत नाहीं, परंतु तसे कांहीं विवाह पंधराव्या शतकांत झाले होते, असें कर्नल टॉड यांच्या 'राजस्थान' ग्रंथावरून समजतें. जाटांत कांहीं जाट हिंदु, कांहीं शीख व कांहीं मुसलमान असून, हिंदु जाटांतही, मुसलमानांचे कांहीं आचारविचार पाळण्यांत येतात. त्यांच्यांतील कांहीं पोटजातींत 'नियोगविधीची' ह्मणजे वडील भाऊ मेला असतां, त्याच्या स्त्रीशीं त्याच्या धाकट्या भावानें विवाह करण्याची चाल असून, या चालीस ते लोक 'चादरचलन' असें ह्मणतात. भरतपुरचा जाट राजवंश हिंदु आहे. जाट लोकांची, यापेक्षां अधिक माहिती कोणास पाहिजे असेल तर त्यानें बालफर साहेबांचा सैक्लोपीडिया आफ इंडिया हा ग्रंथ पहावा.

---

## प्रकरण दुसरें.

सुप्रसिद्ध फारशी ग्रंथकार फिरस्ता यानें जाटवंशीय राजांचा जो ऐतिहासिक वृत्तांत दिलेला आहे, तो येणेंप्रमाणें:— भरतपुरच्या वर्तमान राजवंशाचा मूळ पुरुष, पंजाबांत, सिंधू नदाच्या पलीकडे, राहात असे. तो मोठा बलशाली व साहसी मनुष्य होता. तो पहिल्यानें लुटारूपणा करीत असे. नंतर कांहीं दिवसांनीं, तो सिंधु नदाच्या अलीकडे, मुलतान शहरानजीक येऊन राहिला. इसवी सन १०२६ त, गिझनीचा महमूद गुजराथेंत फिरत असतां, त्यानें जाट लोकांच्या एका सैन्यास वेढा देऊन त्यांतील बहुतेक लोक ठार मारिले! इ० स० १३९७ त, तैमुरलंगानें दिल्लीवर स्वारी केली, त्या वेळींही, जाट लोकांकडून त्यास पुष्कळ उपद्रव झाल्यामुळें,

त्यानें रागानें बरेच जाट मारिले. पुनः इ० स० १५२५ त, दिल्लीच्या मोगल घराण्याचा प्रतापी मूळपुरुष बाबर हा पंजाबांत आला, त्या वेळीं, त्याच्याशींही दोन हात करण्यास जाटांनीं कमी केलें नाहीं, व तेव्हां हे लोक इतके बलिष्ठ झाले होते कीं, त्यांचा पराभव करितांना बाबराचें अफगाण सैन्य अगदीं हत-वीर्य होऊन गेलें.

वरील कालानंतर जाट लोक बरेच नांवारूपास आले. आप-सांतील द्वैतभाव विसरून, आपण सारे एका जातीचे लोक आहों, असें ते समजूं लागले व आपणां सर्वांस नियमन करणारा असा कोणी योग्य मनुष्य आपला प्रमुख असावा, असें त्यांस वाटूं लागलें. नंतर इ० स० १७२९ सालीं, महमदशाह बादशाहाच्या कारकीर्दींत, सर्व जाटांनीं मिळून चूडामणि नामक एका जाटास, आपलें प्रमुखत्व दिलें. या चूडामणि जाटानें, दिल्लीचे सय्यदबंधु—सय्यद हुसेनखां व सय्यद अबदुल्ला यांस साहाय्य केलें होतें, ते उपकार फेडण्या-साठीं त्या सय्यदबंधूंनीं त्यांस दोन लाख मोहोरा बक्षीस दिल्या. या सय्यद बंधूंचा पराभव दिल्लीच्या बादशाहानें केल्यावर, त्यांस मदत करणाऱ्या चूडामणि जाटाचें पारिपत्य करण्याचा त्यानें हुकूम सोडिला, परंतु चूडामणि लवकरच मरण पाव-ल्यामुळें तो हुकूम अमलांत आणितां आला नाहीं. चूडाम-णीच्या पश्चात्, त्याचा मुलगा जाटांचा राजा झाला; त्यास पकडून आणण्याकरितां बादशाहानें आपलें लष्कर पाठविलें; परंतु जाट लोकांनीं मोठा पराक्रम करून त्या सैन्याचा अगदीं मोड करून टाकिला!

सुप्रसिद्ध सूर्यमल जाट हा चूडामणीचा नातू होय. त्यानें आपल्या बापाच्या पश्चात्, जाटांचें प्रमुखत्व पतकरून, लूट

करून पुष्कळ द्रव्य संपादिलें व अनेक पराक्रम केले. बल आणि साहस हीं एकत्र झालीं कीं, तेथें लक्ष्मी हात जोडून उभी राहिली ह्मणून समजावें. सूर्यमल जाटाचा पराक्रम अवलोकन करून जयपुरचा राजा फार खूष झाला व प्रसंग-विशेषीं त्यानें आपल्या उपयोगीं पडावें ह्मणून, त्यास सर्वप्रकारें साहाय्य करूं लागला. अशा प्रकारें उत्तेजन मिळत गेल्या-मुळें, सूर्यमल जाटानें, इ० स० १७७० त, डीग आणि कुम्भीर या नांवाचे दोन प्रचंड किल्ले बांधिले. यानंतर त्यास अशी महत्वाकांक्षा उत्पन्न झाली कीं, भरतपुर हें दुर्भेद्य स्थान आपलें राजधानीचें शहर करावें, व त्याप्रमाणें आपल्या जाट अनुचारांसह तो तेथें जाऊन राहिला. जयपुरचा राजा, सूर्य-मलाशीं पुढें द्वेषबुद्धीनें वागूं लागला. कांहीं दिवसांनंतर गाजीउद्दीन, मराठे व जयपुरकर यांच्या एकवट झालेल्या लष्कराबरोबर, सूर्यमलास लढाई करणें भाग पडलें, व त्यांत विजयश्रीनें शेवटीं त्यालाच माळ घातली. यापूर्वीं, सन १७५६ त, सूर्यमलानें आपल्या नांवामागें राजा हें पद धारण केलें होतें. याच वेळीं, अहमदशाह अबदाली दुराणी यानें हिंदुस्थानावर स्वारी केली. मराठ्यांचें सर्व सैन्य एकत्र होऊन त्यास प्रतिबंध करण्यासाठीं दिल्लीकडे येत असतां, राजा सूर्यमल आपल्या ३०,००० फौजेसह त्यांस जाऊन मिळाला होता, परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, मराठ्यांचा अभिमानी सेनापति भाऊसाहेब यांचें युद्धधोरण त्यास पसंत न पडल्यामुळें, सूर्यमल असंतुष्ट होऊन मराठ्यांचें सैन्य सोडून गेला! जर असा प्रसंग न येता, व सुभेदार मल्हारराव होळकर व राजा सूर्यमल या कसलेल्या सेनापतींच्या बहुमोल मसलतीचा निषेध सदाशिवरावभाऊंनीं केला नसता, तर पानिपतच्या लढाईंत

मराठ्यांचा जय खात्रीनें झाला असता, असें पुष्कळ इतिहासकारांचें मत आहे.

पानिपतच्या लढाईंत मराठ्यांचा मोड झाल्यावर, देशांत, जिकडे तिकडे मोठी गडबड उडून गेली. त्या वेळीं, ज्यांच्या अंगांत थोडेंसें शौर्य होतें त्यांनीं आपलें व आपल्या परिवाराचें चांगलेंच कल्याण करून घेतलें; मग सूर्यमलासारख्या प्रतापी व चतुर पुरुषानें आपल्या शौर्याचा उपयोग अशा वेळीं करून घेतला तर त्यांत काय आश्चर्य आहे? त्यानें कोणाशींही युद्धाचा प्रसंग न येऊं देतां आग्र्याचा किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. या वेळीं, जाट लोकांच्या शौर्याची फार प्रख्याति झाली, व राजा सूर्यमल आतां आपल्या इतक्या दिवसांच्या कर्तबगारीनें प्राप्त झालेल्या राजवैभवाचा सुखानें उपभोग घेणार तोंच, दिल्लीपतीचा सेनापति नजीब उद्दौला याशीं त्याची लढाई होऊन तींत तो मरण पावला!

---

## प्रकरण तिसरें.

राजा सूर्यमलाच्या प्रमुखत्वाखालीं, जाट लोकांच्या भरतपुरच्या राज्याचा विस्तार बराच झाला होता. यमुनानदीच्या उत्तरेस दिल्लीपर्यंत व दक्षिणेस ग्वालेरपर्यंत हें राज्य पसरलें. १६० मैल लांब व ५० मैल रुंद, एवढा प्रदेश या वेळीं जाटांच्या ताब्यांत आला, परंतु सूर्यमलाच्या मरणानंतर, कर्त्या पुरुषाच्या अभावामुळें, जाटांच्या वैभवास उतरती कळा लागली. सन १७७४ त, दिल्लीच्या बादशाहाचा सेनापति नजफखान यानें, सूर्यमलाचा तिसरा मुलगा नवलसिंह याजकडून, आग्र्याचा किल्ला व दुसरीं कित्येक स्थळें हिरावून घेतलीं. त्यानंतर लवकरच भरतपुरच्या राजवंशांत

कलह उत्पन्न होऊन, आपआपसांत लढाया होऊं लागल्या, व हिंदुस्थानांतील या राजघराण्यांतील लोकांच्या ज्या महत्वाकांक्षेमुळें या देशास ही दुःस्थिति प्राप्त झालेली आहे, त्याच महत्वाकांक्षेमुळें भरतपुरचें प्रबळ राज्य प्रस्तुतच्या दुर्बलतेस पात्र झालें!

सूर्यमलाचा नातू रणजितसिंह हा भरतपुरच्या गादीवर असतानां, इ० स० १८०५ मध्यें तो किल्ला घेण्याकरितां इंग्लिश सैन्याचा सेनापति लार्डलेक ह्यानें तीन महिनेपर्यंत वेढा घातला होता, आणि त्या किल्ल्यावर चार वेळां हल्ला केला होता. पण ह्या चारीवेळां त्याचा पूर्ण पराभव झाला. तरी शेवटीं वीस लाख रुपये स्वारी खर्चाबद्दल त्यास देऊन त्यानें इंग्लिशांशीं तह केला. यापूर्वीं किंवा या नंतर, इंग्रजांनीं दुसऱ्या अनेक किल्ल्यांस वेढे दिले, परंतु अशा प्रकारची माघार त्यांस कोठेंही सोसावी लागली नाहीं. ही गोष्ट, प्रसिद्ध आंग्ल-इतिहासकार मिल्ल मेलिसन साहेब यांनींही स्पष्टपणें कबूल केली आहे.

भरतपूरचें युद्ध येवढें महत्वाचें असतां, त्यासंबंधानें ह्मणण्यासारखी माहिती उपलब्ध नसावी, हें आश्चर्य होय. या युद्धांतील इंग्रजी योद्धा लॉर्ड लेक व दुय्यम योद्धा थॉर्न साहेब, या दोघांनीं मात्र या लढाइची साद्यंत हकिकत लिहून ठेविलेली आहे व आह्मांस आज सर्वस्वी तिच्यावरच विश्वास ठेवून, निर्वाह करून घेणें भाग आहे. या परकीय लेखकांनीं, स्वपक्षाचे गुणानुवाद गाण्यांत जितकें औदार्य दाखविलें आहे, तितकें आपल्या विरुद्ध पक्षाच्या पराक्रमवर्णनांत दाखविलेलें नाहीं. शत्रूच्या शौर्याची साग्र व यथास्थित हकि-

कत देण्यास, ग्रंथकाराचें मन बरेंच उदार असावें लागतें. एकंदरींत या ठिकाणीं, खऱ्या माहितीच्या अभावीं, बऱ्याच गोष्टी संशयास्पद राहण्याचा संभव आहे; तथापि येवढें मात्र खरें आहे कीं, ज्याअर्थीं लॉर्ड लेकसारख्या महायोद्धयास चार वेळ माघार घ्यावी लागली, त्याअर्थीं जाट लोकांनीं या युद्धांत, चांगलेंच युद्धचातुर्य दाखविलें असलें पाहिजे, हें उघड आहे.

हें भरतपूरचें युद्ध होण्याच्या पूर्वीं, हिंदुस्थानचें सार्वभौमत्व आपल्या हातीं यावें ह्मणून इंग्रज लोकांनीं अनेक राजकारस्थानें सुरू केलीं होतीं. या वेळीं, देशांत जे दुर्बळ लोक होते, ते इंग्रजांस मुकाट्यानें शरण येत होते. परंतु जे आपणांस बलवान् ह्मणवीत असत व दुसऱ्याच्या स्वाधीन होण्यापेक्षां मरण आलेलें चांगलें असा अभिमान बाळगीत असत, त्यांच्या व इंग्रजांच्या रोज झटापटी होत होत्या. अशा अभिमानी पुरुषांपैकींच यशवंतराव होळकर हे एक होत. त्यांनीं इंग्रजांस पुष्कळ लढाया दिल्या, परंतु इंग्रजांच्या कवाइती फौजेपुढें त्यांच्या लष्कराचें कांहीं चाललें नाहीं. शेवटीं, त्यांस, भरतपुरच्या राजाचा आश्रय करणें भाग पडलें. मथुरेपासून १४ मैलांवर, डीग या नांवाचा जो सुप्रसिद्ध किल्ला आहे, त्याचा होळकरांनीं आश्रय केला होता, परंतु तेथेंही त्यांस हार खावी लागल्यामुळें, ते आपल्या फौजेसह भरतपुरच्या राज्यांत आले व भरतपूरच्या राजानें त्यांस साहाय्य करण्याचें कबूल केलें. त्या वेळीं, होळकरांचा पाठलाग करणाऱ्या इंग्रजी सैन्यावर, भरतपुरच्या राजानें तोफांचा भडिमार केल्यामुळें त्यास तेथून जाणें भाग पडलें!

इ० स० १८०३ मध्यें, भरतपुरकर व इंग्रज यांच्यामध्यें एक तह झाला होता. या तहाचीं कलमें पुढें लिहिल्याप्रमाणें

होतीं:–इंग्रजांनीं परशत्रूपासून भरतपूरचें संरक्षण करावें. भरतपुरच्या राज्यव्यवस्थेंत, इंग्रजांनीं आपण होऊन बिलकूल ढवळाढवळ करूं नये. भरतपुरचा राजा मराठ्यांस जो कर देत असे, तो त्यानें अतःपर त्यांस देऊं नये. शिंद्यानें भरतपुरकरांचा पराभव करून त्यांचीं जीं ठिकाणें घेतलीं होतीं, त्यांतील बहुतेक ठिकाणें त्यांस परत मिळावीं.

वरील तहानंतर जेव्हां भरतपूरच्या राजानें होळकरांस आश्रय दिला, तेव्हां त्यानें तह मोडिला असें समजून इंग्रजांनीं आपलें लष्कर भरतपुरावर पाठविलें. इ. स. १८०४, ता० २८ डिसेंबर रोजीं, हें इंग्रजी सैन्य, डीग कडून भरतपुराकडे येत असतां, वाटेंत मेजर जनरल डौडेसवेल हा त्यास येऊन मिळाला. इ. स. १८०५, ता० १ जानेवारी रोजीं, इंग्रजी सैन्य कुंभीर येथें जाऊन पोहोंचलें, व दुसऱ्या दिवशीं, भरतपूरच्या दक्षिण व पश्चिम वेशींच्या बाहेर त्यानें तळ दिला. तेथें इंग्रजी सेनापतीनें आपल्या लष्कराची मुख्य छावणी केली व जनरल मेटलेंड यास भरतपुरच्या किल्ह्यावर मारा करण्याचा हुकूम केला. मेटलेंड साहेबानें छावणीपासून बऱ्याच अंतरावर असलेला एक बगीचा हस्तगत केला, व तेथें, ता० ४ जानेवारी रोजीं, खंदक खणून, दुसऱ्या दिवशीं रात्रौ, किल्ल्यावर तोफांचा भडिमार करण्याकरितां दोन मातीचे मोर्चे उभे केले.

या मोहिमेंतील इंग्रजी सैन्याचा अधिपति थॉर्नसाहेब यानें जो इतिहास लिहिला आहे, त्यांत त्यानें, भरतपूरच्या किल्ल्यांत, या वेळीं, ८०,००० सैन्य होतें असें लिहिलें आहे. या लिहिण्यांत, शत्रूचें सैन्य फार मोठें होतें व त्यामुळेंच इंग्रजांचा पराभव झाला, असें ध्वनित करण्याचा, थॉर्नसाहेबांचा उद्देश होता किंवा नाहीं, हें सांगतां येत नाहीं; तथापि इंग्रज इतिहास-

कार म्यालिसन यानें, या वेळीं भरतपुरांत, ८,००० पेक्षां अधिक सैन्य नव्हतें. असें लिहिलें आहे, यावरून थॉर्नसाहेबांचा आंकडा बराच संशयास्पद असावा हें उघड होतें. कोठें ८०,००० आणि कोठें ८,००० ! हा थॉर्नसाहेबांचा केवळ हस्तदोष असेल तर कांहीं मोठेंसें आश्चर्य नाहीं. असो. भरतपुरच्या किल्ल्यांत, या वेळीं, किती फौज होती, हें जरी नक्की समजत नाहीं, तरी किल्ल्यांतील जाट लोकांची अशी समजूत होती कीं, भरतपूर दुर्ग केवळ अजिंक्य आहे. 'जोंपर्यंत, लांब नाकाचा घड्याळ मासा येऊन भरतपूरच्या खंदकांतील पाणी शोषण करूं लागला नाहीं तोंपर्यंत, शत्रूकडून किल्ला जिंकला जाण्याची मुळींच भीति नाहीं !' या विधानावर जाट लोकांचा पूर्ण विश्वास होता, ह्मणूनच त्यांनीं इंग्रजी सैन्याची पर्वा केली नाहीं.

इंग्रजी सेनापति लॉर्ड लेक हाही, भरतपूरचा किल्ला घेणें हें सामान्य काम नाहीं, हें पूर्ण समजून होता. तटाची भिंत जरी मातीची होती तरी फार मजबूद होती. शिवाय असला प्रचंड तट पाडावयास लागणाऱ्या मोठ्या तोफा इंग्रजांपाशीं नव्हत्या. तथापि, आपण विजयी होऊं, अशी लॉर्ड लेक याची खात्री होती; कारण कीं, त्यांच्या सैन्यानें पुष्कळ लढाया मारून मोठी कीर्ति संपादन केली होती.

---

## प्रकरण चौथें.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें इंग्रजी सेना भरतपुरानजीक येऊन थडकल्यावर, शहरांतील जाट लोकांनींही आपल्या सेनेची पूर्ण तयारी करून, शत्रूंशीं दोन हात करण्याची संधि केव्हां येते, याची ते वाट पाहात बसले. इकडे, इंग्रजी सेना-

पतीनें शहराच्या तटावर तोफांच्या गोळ्यांचा पाऊस पाडण्यास प्रारंभ केला. हा मारा तटाच्या पश्चिम व दक्षिण द्वारांवर सारखा चालू असतां, ता० ९ जानेवारी १८०५ रोजीं, तटास एक खिंडार पडलेलें इंग्रजी सेनापतीच्या दृष्टीस पडलें. संध्याकाळीं ७ वाजतां, इंग्रजी सैन्य आंत घुसूं लागलें. या सैन्याचे तीन भाग केले होते. पहिल्या भागाचा अधिकारी लेफ्टनंट कर्नल रिपन हा असून, त्याच्या हाताखालीं २४० गोरे शिपाई व देशी शिपायांची एक पलटण, येवढें सैन्य होतें. तटास खिंडार पडतांच, पहिल्यानें हा रिपन साहेब आपल्या सैन्यासह आंत घुसला. दुसऱ्या भागाचा सेनापति मेजर हॉक्स हा दोन गोऱ्या पलटणी व दोन देशी पलटणी, इतकें सैन्य घेऊन दक्षिण दिशेकडून आंत शिरण्याचा प्रयत्न करूं लागला. तेथेंच होळकरांच्या सैन्याचा तळ असून, त्यांस हांकून देऊन त्यांच्या सर्व तोफा आपण हिसकून घेऊं, अशी मेजर हॉक्स यास धमक होती. हे दोन सेनापति तटाच्या आंत घुसत आहेत, तोंच तिसरा सेनापति मेटलेन्ड हाही ५०० गोरे व १,००० काळे शिपाई बरोबर घेऊन त्यांस साहाय्य करण्याकरितां निघाला. ती रात्र काळोखी असून, तीन्ही इंग्रज सेनापति तटाबाहेरील खंदक ओलांडून आंत शिरण्याचा प्रयत्न करीत असतां, तटावरून जाट लोकांनीं तोफांचा भयंकर मारा त्यांजवर सुरू केला. हा मारा रात्रीचे सात वाजल्यापासून बारा वाजतपर्यंत चालू असून, त्यामुळें इंग्रजी सैन्याची अगदीं दाणादाण उडून गेली! सेनापति मेटलेन्ड याचे सैन्याची तर इतकी दुर्दशा झाली कीं, त्यांतील बहुतेक शिपाई आपापले जीव वांचविण्याकरितां, सेनापति रिपन व हॉक्स यांच्या सैन्याकडे पळून गेले, व स्वतः मेटलेन्ड यांसही तोच मार्ग धरावा लागला. इतक्यांत या सैन्यांतील

कांहीं लोक खंदक ओलांडून तटास जाऊन भिडले. या वेळीं, जाटांच्या तीन तोफांचा एकसारखा वर्षाव चालू असतां, लेफ्टनंट मॉनसर या नांवाचा एक तरुण इंग्रज योद्धा जिवावर उदार होऊन, आपल्या वीस साथीदारांसह, तटास जेथें खिंडार पडलें होतें तेथें जाऊन पोहोंचला, व तटावर चढण्याचा प्रयत्न करूं लागला. हें त्याचें साहस अवलोकन करून जाट लोक अगदीं चकित होऊन गेले, व त्याजवर व त्याच्या साथीदारांवर त्यांनीं गोळ्यांचा वर्षाव सुरू केला. तथापि वीर्यशाली पुरुष प्रत्यक्ष प्राण जाण्याचा प्रसंग आला तरीही समरभूमीपासून परावृत्त होत नाहींत. जाटांच्या गोळीबाराची बिलकूल पर्वा न करितां मॉनसर साहेबांच्या साथीदारांपैकीं चार असामी तटावर चढले. इतक्यांत एका जाट शिपायानें त्यांपैकीं एकास लाथ मारून खालीं फेंकून दिलें व इतरांचीही तीच अवस्था केली! तटाबाहेरील लोकांसही दरवाजा धरून बसणें कठीण पडूं लागलें, एवढेंच नव्हे, तर जाटांच्या बंदुकांच्या गोळ्यांचा वर्षाव व त्यांच्या एकप्रकारच्या लोहपात्रांतून तप्त होऊन बाहेर पडणारीं तीक्ष्ण शस्त्रें, यांजपुढें टिकाव न लागल्यामुळें, इंग्रजी सैन्यास शेवटीं तटाचा दरवाजा सोडून मागें हटावें लागलें.

या प्रकारें पराभूत झाल्यावर, आपला कांहींच उपाय चालत नाहीं असें पाहून, मॉनसर साहेब आपल्या साथीदारांस त्या खिंडारापाशीं ठेवून, मेटलेन्ड साहेबाच्या शोधास निघाला. बऱ्याच वेळानें त्या दोघांची गांठ पडली व मॉनसरसाहेब, मेटलेन्ड व त्याचें सैन्य यांसहवर्तमान आपल्या साथीदारांस येऊन मिळाला. खिंडारापाशीं, भरपूर सैन्य जमलें, असें पाहून सेनापति मेटलेन्ड यानें आपल्या सैन्यास तटावर चढण्याचा हुकूम केला. इकडे हॉक्स साहेबानें तटाबाहेरील

जाट सैन्याचा पराभव केला, व त्याच्या तोफा हस्तगत करून त्या अगदीं निरुपयोगी करून टाकिल्या. नंतर, मेटलेन्ड यास जाऊन मिळण्याकरितां त्यानें पुढें कूच केलें. त्याचप्रमाणें कर्नल रिपन यानेंही शत्रुसैन्याची फळी फोडून दुर्गद्वारांतून आंत जाण्याचा प्रयत्न चालविला होता; परंतु तटाच्या आंत दुसरा मोठा खंदक असल्यामुळें त्यास माघार घ्यावी लागली. हळहळू रात्र होत चालली, व काळोखामुळें इंग्रज सेनापतीस कोणत्याही प्रकारचा निर्णय करितां येईना. जागा कांहीं ठिकाणीं उच्च व कांहीं ठिकाणीं सखल असल्यामुळें चालतांना, सैन्यांतील शिपाई अडखळून पडूं लागले. शिवाय तटावरून, जाट लोकांच्या तोफांचा मारा एकसारखा चालू होता. इतक्याही अडचणींस मागें सारून, इंग्रजी सैन्यांतील कांहीं साहसी शिपाई खिंडारांतून आंत जाण्याचा प्रयत्न करीत असतां, जाटांनीं आपल्या तीक्ष्ण खड्गांनीं त्यांवर प्रहार करून त्यांस ठार मारिलें. या चकमकींत, स्वीटनेम व क्रेसवेल् या नांवांचे दोन इंग्रज योद्धेही घायाळ झाले. या वेळीं, हा प्राणहारक प्रयत्न सोडून देऊन मागें फिरावें हें बरें, असें इंग्रजी सैन्यानें जनरल मेटलेन्ड यास सांगितलें, परंतु तो अद्याप निराश झालेला नसल्यामुळें ह्मणा किंवा त्याच्या गळयास यमपाश पडले होते यामुळें ह्मणा, त्यानें तें नाकारिलें, व स्वतः तटावर चढण्याचा प्रयत्न चालविला! परंतु तो तटाच्या माथ्यावर चढला न चढला इतक्यांत, जाटांकडील एका शिपायानें आपल्या बंदुकीची गोळी सोडून त्यास तत्काळ ठार केलें, व त्याचें प्रेत तटावरून खालीं पडतांच, इंग्रजी सैन्यांत एकच हाहाकार उडाला. तेव्हां तर अगदींच निराशा झाली. सेनाध्यक्ष धारातीर्थीं पतन

पावतांच इंग्रजी सैन्य सैरावैरा पळूं लागलें. पळतेवेळीं-सुद्धां, जाटांच्या बंदुकांस कैक शिपाई बळी पडले! कित्येक शिपाई खंदकांत पडून बुडून मेले! थॉर्न साहेब लिहितो, 'या लढाईत, ४० गोरे व ४२ काळे शिपाई मारले गेले, व २६० गोरे व १२५ काळे शिपाई जखमी झाले'! इंग्रजांचा पूर्ण पराभव झाला व जाट विजयी झाले. या युद्धांत कर्नल मेटलेन्ड, क्यापटन् वॉलेस, लेफ्टनंट क्लब, पर-सिव्हल व एन्साईन वॉटर हौस हे पांच इंग्रज योद्धे (ऑ-फिसर्स) मरण पावले, व मेजर क्यांबेल, क्याप्टन् हेसमन्, लेफ्टनंट वाईन टूली, म्याकल्क्लान्, म्याथ्यूसन्, एन्साहेन, हार्टकील, क्याप्टन् वेबनर, ले० क्रासग्रोव, सॉटन्यांग, क्रेसवेल, उड्, ह्यामिल्टन्, ब्राऊन, लेटर, कर्कटर्नब्रुल, मेजर ग्रेगरी, क्याप्टन् ओडोनेल, फ्रेवर, शार्प, बेकर व फ्लेचर हे २४ योद्धे जखमी झाले. एकंदरींत या नऊ दिवसांच्या युद्धांत जाट लोकांनीं मोठा वर्णनीय पराक्रम केला ह्मणावयाचा!

---

## प्रकरण पांचवें.

मागील प्रकरणांत वर्णिल्याप्रमाणें खडतर प्रसंग प्राप्त झाला असतांही, इंग्रजी सैन्यानें आपलें धैर्य बिलकूल खचूं न देतां, भरतपुरच्या तटावर दुसरा दुप्पट जोराचा हल्ला करण्याची तयारी चालविली. ही तयारी ता० १० जानेवारीपासून १५ जानेवारी-पर्यंत चालली होती, व तटावर तोफा चालविण्याची व्यवस्था पूर्वींच्या व्यवस्थेपेक्षां अधिक चांगली केली होती. इकडे जाट लोकही स्वस्थ बसले नव्हते. ता० ९ जानेवारीच्या युद्धांत वि-जयश्री मिळाल्यानंतर दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं, त्यांनीं, तटाचा

जो भाग पडला होता, तो पुनः पूर्ववत् बांधून काढण्याचें काम सुरू केलें. हें काम शेवटास जाऊं नये ह्मणून इंग्रजांनीं त्यांजवर आपल्या तोफा सोडण्याचा सपाटा चालविला, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. जाटांनीं इंग्रजी तोफखान्याच्या अग्निवृष्टीची बिलकूल पर्वा न करितां, तटाचें खिंडार पूर्ववत् बांधून काढिलें. इकडे इंग्रजांनीं ती जागा सोडून देऊन, दुसरीकडे जवळच तटास एक लहानसें भोंक पडलें होतें, तिकडे आपल्या तोफांचे मोर्चे फिरविले, व ता० १६ जानेवारी रोजीं, एकदम २७ तोफांचा भयंकर मारा तटावर चालू केला. याचा परिणाम असा झाला कीं, दुसऱ्या दिवशीं तटास बरेंच मोठें खिंडार पडलेलें इंग्रज सेनापतींच्या दृष्टीस पडलें. हें नवें खिंडारही पूर्ववत् बांधण्याचें काम जाटांनीं सुरू केलें, परंतु इंग्रजी तोफांच्या माऱ्यापुढें त्यांच्यानें बिलकूल टिकाव धरवेना, व तें खिंडार अधिकच मोठें होत चाललें. इकडे जाटांचा राजा रणजितसिंह याचा चुलता रणधीरसिंह हा ता० ९ जानेवारी रोजीं, इंग्रजांचा ज्या ठिकाणीं मोड झाला होता, त्या ठिकाणाची बारकाईनें पाहणी करीत असतां, इंग्रजी तोफेचा एक गोळा लागून मरण पावला ! हें इंग्रजांचें कृत्य अवलोकन करून, राजा रणजितसिंह अगदीं आश्चर्यचकित होऊन गेला व आपल्या चुलत्याच्या मृत्यूनें आपलें सैन्य भीतिग्रस्त न व्हावें ह्मणून आपल्या सर्व लोकांस उद्देशून ह्मणाला, 'वीर हो ! माझी तर अशी प्रतिज्ञा आहे कीं, युद्धांत मरेन तरी एक, किंवा दुर्गाचें संरक्षण तरी करीन एक; याशिवाय दुसऱ्या मार्गाचें अवलंबन कदापि करणार नाहीं. युद्ध करीत असतां मृत्यु पावणें हें जाटांचें कर्तव्यकर्मच होय. आमच्या पूज्य पूर्वजांनीं तेंच केलें, व आह्मांसही आतां तेंच केलें पाहिजे. युद्धांत मेलों तरी बेहत्तर, परंतु इंग्रजांस शरण जाऊन आपल्या

पूर्वजांच्या धवल कीर्तीस काळिमा लावण्याची व त्यांनीं घालून दिलेल्या मर्यादेचें उल्लंघन करण्याची वार्ताही नको.'

रणजितसिंहाचें भाषण पुरें होतें न होतें तोंच, 'नको, नको, असली अशुभ वार्ताही आमच्या कानीं पडावयास नको,' असा विराट् ध्वनि, जाटसेनासमुद्रांतून निघून, त्याचा प्रतिध्वनि भरतपुरच्या दुर्गांत दुमदुमूं लागला! ही जणूं काय आकाशवाणीच झाली, असें समजून राणा रणजितसिंह दुर्गरक्षणाची व्यवस्था उत्साहपुर्वक करूं लागला. इतक्यांत, रोहिलखंडांतील मुसलमान सरदार अमीरखान हाही आपल्या सैन्यासह, भरतपुरकरांस येऊन मिळाला. इकडे इंग्रजांनीं आपल्या प्रचंड तोफांचा मारा, ता० २१ जानेवारीपर्यंत, एकसारखा चालू ठेविला होता. परंतु भरतपूरकरांनीं, त्यांच्या एकाही तोफेस जबाब दिला नाहीं, किंवा बंदुकीचा एकही आवाज काढिला नाहीं. तटाचे आंत सशस्त्र उभे राहून इंग्रजी सैन्याच्या आगमनाची ते प्रतीक्षा करीत होते! ही जाटांची स्तब्धता पाहून, इंग्रज पहिल्यानें अगदीं चकित होऊन गेले, परंतु मागाहून, अशा प्रकारें स्तब्ध राहण्यांत जाटांचा कांहीं तरी मतलब असला पाहिजे, असा त्यांस संशय आल्यामुळें, आपलें सैन्य तटाजवळ नेण्याचें त्यांस धैर्य होईना. ता० २१ जानेवारी रोजीं, तटाचा कांहीं भाग तोफांच्या माऱ्यानें तुटून पडला असतांही, तेथपर्यंतचा मार्ग आक्रमण करणें इंग्रजांस अशक्य वाटूं लागलें, कारण खंदकाच्या बाहेरील व तटाच्या आंतील ठिकाणांची पुरी माहिती नसल्यामुळें, ता० ९ जानेवारी रोजीं, त्यांस जो भयंकर अपजय प्राप्त झाला होता, त्याची अद्याप त्यांस विस्मृति पडली नव्हती. तेव्हां त्या ठिकाणांची पूर्ण माहिती मिळाल्याशिवाय, एकदम चाल करून जाण्याचें त्यांस

धैर्य ह्या वेळीं झालें नाहीं तर त्यांत कांहीं मोठेंसें आश्चर्य नाहीं. बरें, तशा प्रकारची माहिती मिळविण्याचा प्रयत्न करणें, हें तरी सामान्य प्रतीचें काम होतें असें नाहीं. या कामीं कदाचित् प्राणसंकटही प्राप्त होण्याचा संभव होता व त्यामुळें असलें साहस करण्यास कोणीही प्रवृत्त होईना. शेवटीं, इंग्रजांच्या देशी सैन्यांतील एका साहसी हवलदारानें, सर्व माहिती मिळविण्याचा विडा उचलला, व त्यास साहाय्य करण्यास दोन देशी शिपाई तयार होऊन, तेही त्याजबरोबर तटाकडे जावयास निघाले. या लोकांनीं कशी चमत्कारिक युक्ति लढविली पहा. त्यांनीं, हुबेहुब जाट लोकांसारखा पोषाख केला व घोड्यांवर बसून भरतपुरच्या तटाकडे ते पळत सुटले, व इंग्रजी फौजेंतील कांहीं स्वार, त्यांस पकडण्याकरितां ह्मणून त्यांच्या मागें लागले! या स्वारांनीं त्यांच्यावर आपल्या बंदुका झाडण्याचाही सपाटा चालविला होता, परंतु त्यांत गोळ्या मात्र घातल्या नव्हत्या! हा प्रकार पाहून किल्ल्यांतील जाट लोकांस असें वाटलें कीं, हे तीन असामी इंग्रजी सैन्यांतून फुटून आपल्या पक्षास मिळावयास येत आहेत, व त्यांचा पाठलाग करण्याकरितां इंग्रजी स्वार त्यांच्या मागें लागले आहेत! हा जाटांचा समज दृढ व्हावा ह्मणून इकडे त्या कावेबाज इंग्रजी हवलदाराच्या साथीदारांनीं तटाजवळ येतांच, घोड्यांवरून खालीं पडल्याचा बहाणा केला, व हवलदार जाटांस उद्देशून मोठ्यानें ओरडला, 'भाईहो! तटाच्या आंत येण्याचा मार्ग कोठें आहे, तो आह्मांस लवकर दाखवून आमचे जीव वांचवा; नाहींतर या बदमाष इंग्रजी स्वारांच्या तलवारींस आह्मी खचीत बळी पडतों!' हें त्यांचें मानभावीपणाचें भाषण ऐकून, भोळ्या बिचाऱ्या जाटांस त्यांचा बिलकूल संशय न येतां, त्यांनीं त्यांस तटाचें द्वार दाखवून निःशंकपणें आंत येऊं दिलें! आंत

येतांच, त्या मतलबी लोकांनीं, तटाचा जो भाग पडला होता, त्याची सूक्ष्म दृष्टीनें पाहणी केली, व भरपूर माहिती मिळतांच, आपल्या घोड्यांस टांच मारून, विजेच्या वेगानें ते एकदम आपल्या गोटाकडे पळत सुटले ! हें त्यांचें कपटकृत्य उघडकीस येतांच, जाटांनीं त्यांजवर आपल्या बंदुका झाडिल्या, परंतु त्यांतून बचावून तो हवलदार व त्याचे दोन्ही साथीदार सुखरूपपणें इंग्रजी सैन्यांत जाऊन पोहोंचले. हवलदारानें आपल्या सेनापतीस अशी माहिती दिली कीं, तटाबाहेरील खंदक फार खोल नसून तो उतरून पलीकडे जाणें फार कठीण आहे, असें नाहीं. तसेंच, रस्ताही साफ असून तटाची उंचीही फार आहे असें नाहीं. ही माहिती मिळतांच इंग्रजी सैन्यांत, एकच आनंदीआनंद होऊन गेला. सेनापतीनें त्या तिन्ही बातमीदारांस प्रत्येकीं पांचशें रुपये बक्षीस दिले व पुनः तटावर चालून जाण्याची तयारी चालविली.

ता० २१ जानेवारी रोजीं, पूर्वीच्या युद्धांत जखमी झालेला इंग्रज योद्धा कप्तान लिंड्से यानें आपल्या ४७० शिपायांसह, पुनः भरतपूरच्या तटावर चाल केली. त्यास मदत करण्याकरितां आणखी बरेंच सैन्य निघालें. हवलदार व त्याचे साथीदार यांच्या सांगण्यावरून, खंदक ओलांडण्यास उपयोगीं पडेल अशी एक शिडी तयार करून ती कप्तान लिंड्से यानें आपल्याबरोबर घेतली होती. तटाजवळ जाऊन पोहोंचल्यावर, हवलदारानें ज्या ठिकाणाची माहिती दिली होती, तें ठिकाण जाटांनीं चौपट मजबूद केलेलें पाहून इंग्रजी सैन्यास मोठें आश्चर्य वाटलें. कप्तानानें बरोबर आणिलेल्या शिडीचा तर कांहींच उपयोग झाला नाहीं ! कारण, खंदकांत अधिक पाणी येऊन तो दुस्तर व्हावा ह्मणून जाटांनीं एक मोठा बांध घालून खंदकाची

रुंदी पुष्कळ वाढविली होती. हा सर्व प्रकार पाहून इंग्रजांस जरी मोठें आश्चर्य वाटलें तरी त्यांचा धीर खचला नाहीं. त्यांच्या सैन्यांतील एका शिपायानें खंदकांत बुडी मारून पाण्याची खोली पाहिली, ती आठ फूट भरली. खंदक फार खोल नाहीं, असें समजतांच दुसऱ्या अनेक शिपायांनीं भराभर आंत उड्या टाकिल्या. इकडे, जाट लोकही स्वस्थ बसले नव्हते. त्यांनीं, खंदकांत उड्या टाकणाऱ्या शिपायांवर, बंदुकींचा गोळीबार सुरू केला व त्यामुळें इंग्रजी सैन्याच्या रक्तानें खंदकाचें पाणी तांबडें भडक होऊन गेलें! आतां, हें साहस करण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें दृष्टोत्पत्तीस येतांच, कप्तान लिंड्से यानें, आपल्या सैन्यास, खंदकांतून बाहेर पडून जाण्याचा एकदम हुकूम केला. त्याबरोबर इंग्रजी सैन्य बाहेर जाऊं लागलें; परंतु पळतां पळतां त्यांतील शेंकडो शिपाई, जाटांच्या बंदुकांस बळी पडले. खंदकांत उतरलेले कामगार व शिपाई मिळून ५१७ असामी तेथल्या तेथें ठार मारले गेले, व त्यांचीं प्रेतें, खंदकांतील रक्तोदकावर तरंगूं लागलीं! इकडे हा प्रकार होत आहे तों, दुसरीकडे, इंग्रजी घोडेस्वारांची व जाटांचा राणा रणजितसिंह, होळकर व अमीरखान यांच्या सैन्याची लढाई जुंपण्याचा प्रसंग आला होता, परंतु तो टळला. इंग्रजी सैन्याच्या आणखी एका तुकडीनें, तिसऱ्या एका ठिकाणीं, तटाच्या आंत शिरण्याचा प्रयत्न केला होता, परंतु खंदकांतील पाण्यास भिऊन शेवटीं या तुकडीला मागें फिरावें लागलें, व त्या वेळीं जाट लोकांनीं त्यांतील पुष्कळ शिपाई ठार मारिले! एकंदरींत, या दुसऱ्या हल्ल्यांतही, जाटांनीं इंग्रजांचा पराभव केला.

# प्रकरण साहावें.

भरतपुरचा राजा रणजितसिंह याच्या आत्मरक्षणप्रयत्नाची, जाट वीरांच्या समरकौशल्याची व इंग्रजांच्या साहसोद्योगादि गुणांची धन्य असो! क्रमशः, भरतपूर दुर्गाचें आक्रमण करण्यांत, इंग्रज दोन वेळ भग्नमनोरथ झाले, व त्यांचे शेंकडो शिपाई मेले, व जखमी झाले, तथापि त्यांनीं आपल्या साहसबुद्धीचा त्याग केला नाहीं किंवा दुर्ग आक्रमण करण्याच्या इच्छेचाही त्याग केला नाहीं! दोन वेळ पराभव पावल्यामुळें निराश झालेल्या इंग्रजी सैन्यास हुरूप आणण्यासाठीं सेनापति लॉर्ड लेक साहेबानें एक जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्याचा आशय असाः—

'ज्या लोकांनीं तटाच्या आंत प्रवेश करण्याच्या कामीं, काल खरी वीरता प्रगट केली त्या लोकांना, मी, मनापासून शेंकडों धन्यवाद देतों. तसेंच, जे वीर, कालच्या युद्धांत, धारातीर्थी पतन पावले व जे घायाळ झाले आहेत, त्यांच्यासाठीं माझें अंतःकरण तीळतीळ तुटत आहे. परंतु, जरी दोन वेळ, आह्मी अशा अपमानकारक रीतीनें पराभव पावलों आहों, जरी दोन वेळ, आह्मांस, आमच्या शेंकडो शूर शिपायांच्या मृत्यूची भयंकर हानि सोसावी लागली आहे, तरीही आह्मांस फिरून प्रयत्न करून पाहणें भाग आहे. झालेल्या पराभवांस भिऊन व हताश होऊन, माघार घेतल्यास, आजपर्यंत मिळविलेल्या कीर्तीस आह्मीं काळिमा आणिला, असें होईल; इकडे आमच्या युरोपियन वीरांनीं लक्ष दिलें पाहिजे. प्रत्येक देशी शिपायास, दोनशें रुपये बक्षीस देण्यांत येणार आहेत.'

हा जाहीरनामा प्रसिद्ध होतांच, पुनः इंग्रजी सैन्यांत उत्साह उत्पन्न झाला, व पुनः भरतपुरच्या तटावर हल्ला करण्याची तयारी

होऊं लागली. इतक्यांत, मुंबईहून मेजर जनरल जोन्स हा प्रसिद्ध इंग्रज सेनापति, आपल्या सैन्यासह, लॉर्ड लेक यास येऊन मिळाला. हें नवें सैन्य आपल्या मदतीस आलेलें पाहून, इंग्रजी सैन्य दुप्पट वीरश्रीप्रेरित होऊन सिंहनाद करूं लागलें ! यानंतर, ता० २४ फेब्रुवारी रोजीं, लॉर्ड लेक साहेबानें, इंग्रजी सैन्यास भरतपुरावर चाल करण्याचा हुकूम दिला. यापूर्वीं इंग्रजांचा पराभव जाटांकडून झाल्यापासून, इंग्रजी सैन्यांत कांहीं किरकोळ गोष्टी घडून आल्या होत्या, त्या अशाः–इतके दिवस, एकसारखें युद्ध करावें लागल्यामुळें, इंग्रजी सैन्याची रसद अगदीं संपुष्टांत आली होती, व त्यामुळें मथुरा प्रांतांतून अन्नसामुग्री मागविणें इंग्रजांस भाग पडलें. ही सामुग्री, १२,००० बैलांवर लादून भरतपुराकडे चालविली असतां, भरतपुरचा राणा रणजितसिंह यानें, रोहिलखंडाचा मुसलमान सरदार अमीरखान यास, ती लुटण्याकरितां पाठवून दिलें. ४,००० सैन्य व ४ तोफा यांसह अमीरखानानें, भरतपुरापासून २० मैलांवर, रसद घेऊन येणाऱ्या इंग्रजी सैन्यावर, एकदम हल्ला केला, परंतु त्याचा पराभव होऊन इंग्रजी सैन्यानें त्याच्या सैन्याचीं शस्त्रास्त्रें हिरकून घेतलीं, व स्वतः अमीरखानास वेष पालटून पळून जावें लागलें !

ता० २८ जानेवारी रोजीं, इंग्रजी सैन्य, ५,००० बैलांवर अन्नसामुग्री व शस्त्रें लादून आग्र्याहून भरतपुराकडे येत असतां, रणजितसिंह, यशवंतराव होळकर आणि अमीरखान या तिघांनीं तिजवर एकदम हल्ला केला, परंतु इंग्रजांपुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं !

ता० ६ फेब्रुवारी रोजीं, इंग्रजी सैन्यानें आपलें पहिलें स्थान सोडून तटाच्या दक्षिणेच्या बाजूस, आपला तळ दिला व खंदक तरून जाण्यासाठीं नावा बांधण्याचें काम सुरू केलें. प्रसिद्ध

रोमन योद्धा ज्युलियस सीझर याच्या वेळीं, इंग्लंडांत, गायीच्या कातड्याच्या ज्या एक प्रकारच्या नावांचा उपयोग करण्यांत येत असे, त्याच प्रकारच्या नावा इंग्रजी सैन्यानें या वेळीं बांधिल्या. त्यांतील कित्येक नावा ४० फूट लांब व १६ फूट रुंद, एवढ्या मोठ्या होत्या. या वेळीं, यशवंतराव होळकर व अमीरखान पठाण, हे इंग्रजी सैन्याशीं लढण्याच्या कामीं फार उपयोगीं पडत असल्यामुळें, महाराज रणजितसिंह त्यांजवर फार प्रसन्न झाला होता. परंतु त्या दोघांच्या लष्करासाठीं बहुत पैसा खर्च करावा लागत असल्यामुळें, रणजितसिंहाचा खजिना बहुतेक रिकामा झाला होता. अशा वेळीं येथें राहण्यांत कांहीं फायदा नाहीं, असा विचार करून, अमीरखान आपल्या सैन्यासह रोहिलखंडांत निघून गेला !

इकडे, इंग्रजी, सैन्य आपला तळ हालवून तटाच्या उत्तर व पूर्व या दिशांकडे येऊन जमूं लागलें व त्यानें, खंदकाच्या अगदीं जवळ, मोर्चे बांधून तटावर तोफा रोंखिल्या. ता० ११ फेब्रुवारी रोजीं, या तोफांचा मारा इंग्रजी सैन्यानें किल्ल्याच्या तटावर सुरू केला. आणखीही एक नवी युक्ति योजण्यांत आली होती. खंदकापासून जमिनींतून सुरुंग खणून, तटाखालून गुप्तपणानें तटाचे आंत जाण्याचा प्रयत्न, इंग्रजी सैन्यानें चालविला, व त्याकरितां एक मोठा सुरुंगही तयार करण्यांत आला; परंतु जाट लोकांस हें इंग्रजांचें गुप्त कृत्य तेव्हांच कळून आलें व ता० २० फेब्रुवारी रोजीं, रात्रीच्या वेळीं, काळोखांतून कांहीं जाट शिपाई, त्या सुरुंगांत शिरले. हे लोक इतक्या चलाखीनें आंत शिरले कीं, हुशार इंग्रजांस, त्यांच्या प्रवेशाचा बिलकूल संशय आला नाहीं ! रात्रभर त्या सुरुंगांत छपून राहून उजाडल्यावर, या लोकांनीं सुरुंग खणणाऱ्या इंग्रजी शिपायांचीं शस्त्रास्त्रें व

खोदण्याचें सामान, हीं हिसकून घेतलीं व अशा प्रकारें, इंग्रजांच्या सुरुंग खणण्याच्या उद्योगास, त्यांनीं धाब्यावर बसविलें! या सुरुंगांत शिरलेल्या जाटांची व इंग्रजांची, या प्रसंगीं, जोराची चकमक उडाली, व त्यांत जाटांच्या तीक्ष्ण तलवारींस व भाल्यांस अनेक इंग्रजी शिपाई, एकसमयावच्छेदेंकरून, बळी पडले. शेवटीं, बरेंच मोठें इंग्रजी सैन्य, आपणास घेरण्यासाठीं तटाकडे येत आहे असें पाहतांच जाट शिपाई तटाचे आंत पळून गेले!

पहिल्या व दुसऱ्या युद्धाच्या वेळीं, इंग्रजांनीं आपल्या तोफांच्या माऱ्यानें तटाचा जो भाग पाडून टाकिला होता, तो ह्या तिसऱ्या युद्धापर्यंतच्या अवकाशांत, जाटांनीं पूर्ववत् बांधून काढिला होता, परंतु या खेपेस इंग्रजी तोफांच्या गोळ्यांनीं पुनः तटाचा कांहीं भाग तोडून टाकिला व त्या खिंडारांतून तटाचे आंत शिरण्याचा इंग्रजी सैन्यानें प्रयत्न चालविला. लेफ्टनंट डन् या इंग्रजी योद्ध्यानें, बरेच शिपाई आपल्या बरोबर घेऊन खिंडाराकडे चाल केली. क्याप्टन् ग्रांट यास, शहराबाहेरील जाट सैन्यावर तुटून पडण्याचा इंग्रज सेनापतीचा हुकूम झाल्यावरून, तोही आपलें सैन्य घेऊन तिकडे निघाला. टेलर साहेबानें, एका मोठ्या सैन्यासह, तटाच्या **वीर नारायण** नामक दरवाजाकडे चाल केली. या तीन इंग्रज योद्ध्यांपैकीं क्याप्टन् ग्रांट यानें, शहराबाहेरील थोड्याशा जाट शिपायांवर हल्ला करून त्यांचा पराभव केला व टेलर साहेबांचा व जाटांचा वीर नारायण दरवाजापाशीं, एक लहानसा सामना होऊन, त्यांत साहेब बहाद्दुरांस अपजय प्राप्त होऊन मागें फिरावें लागलें. इंग्रजी सैन्यांतील तिसरा योद्धा ले० डन् याची व जाटांची या प्रसंगीं जी लढाई झाली, तिचा वृत्तांत मात्र इतिहासांत चिर-स्मरणीय होऊन राहिला आहे. प्रचंड इंग्रजी तोफांच्या भयंकर

गोळ्यांनीं तटाचा जो भाग तुटून पडला ह्मणून पूर्वीं लिहिलें आहे, त्या भागांतून आंत शिरण्याचा या योद्ध्यानें प्रयत्न चालविला होता, परंतु त्याचे शिपाई या साहसास प्रवृत्त होण्यास कांकूं करूं लागले. साहेबानें मिठ्ठा भाषण करून आपल्या लोकांस उत्तेजन देण्याची शिकस्त केली, परंतु तिचा कांहींच उपयोग झाला नाहीं. कारण खिंडारांतून आंत जावयाचें ह्मणजे प्रत्यक्ष मृत्युमुखांतच शिरावयाचें, असा सर्व शिपायांचा समज होऊन चुकला होता.

तटावरून तोफांच्या गोळ्यांचा जाटांनीं असा भयंकर वर्षाव सुरू केला होता कीं, प्रत्यक्ष अग्निनारायण आपल्या सहस्र जिव्हांनीं इंग्रजी सैन्याचा स्वाहाकार करूं पहात आहे कीं काय, असें प्रेक्षकांस वाटलें! इकडे, पूर्वींच्या सुरुंगांतून कांहीं इंग्रजी शिपायांनीं तटाचे आंत शिरण्याची अगदीं लगट केली होती, परंतु जाटांनीं त्यांस चारी बाजूंनीं वेढून टाकिल्यामुळें, धारा-तीर्थीं पतन पावून स्वर्गलोक जवळ करण्यापलीकडे त्यांस कांहीं अधिक करितां आलें नाहीं. हें भयंकर वर्तमान मेजर डन् यास समजलें, तेव्हां त्यानें त्या लोकांस साहाय्य करण्या-करितां जाण्याचा आपल्या सैन्यास एकदम हुकूम केला, परंतु हा हुकूम ऐकतो कोण? जाटांच्या भयंकर माऱ्यानें, इंग्रजी शिपाई इतके भीतिग्रस्त होऊन गेले होते कीं, ते एक पाऊलही पुढें टाकीनात! सेनापतीनें त्यांस बक्षिसाची लालूच दाखविली, त्यांची स्तुति केली, त्यांस शिव्या दिल्या व शेवटीं आपली आज्ञा उल्लंघन केल्याबद्दल भयंकर शिक्षा देण्याचा त्यांस धाकही दाखविला, परंतु इंग्रजी सैन्यावर त्याचा बिलकूल परिणाम झाला नाहीं किंवा एकाही शिपायानें तिकडे लक्ष दिलें नाहीं! आपल्या अघाडीचें सैन्य आपलें ऐकत नाहीं असें पाहून, दृढप्रतिज्ञ से-

नाध्यक्ष लेफ्टनंट डन् यानें आपल्या पिछाडीच्या सैन्यास एकदम पुढें सरण्याचा हुकूम दिला. हा हुकूम मान्य करण्यास तें सैन्यही पहिल्यानें कांकूं करूं लागलें, परंतु डन् साहेबाच्या उत्तेजक शब्दांनीं थोडासा धीर आल्यावर, त्या सैन्यांतील शिपाई जोरानें पुढें सरले, व मोठ्या धैर्यानें खंदक ओलांडून अलीकडे आले. हे लोक तटाच्या तुटलेल्या भागांत शिरून तटाच्या आंत शिरण्याचा प्रयत्न करूं लागले, व कांहीं शिपाई तटावरही चढले, परंतु त्यांस साहाय्य करावयास दुसरे शिपाई तयार नसल्यामुळें, आंत उतरण्याचें धैर्य त्यांस होईना. सेनापतीनें वारंवार आग्रह केल्यावर व धमकाविल्यावर, फक्त १४ शिपाई, या तटावर चढलेल्या शिपायांस साहाय्य करावयास पुढें झाले. इतर शिपाई भयानें इतके गांगरून गेले होते कीं, केवळ दगडाच्या पुतळ्यांप्रमाणें त्यांची हालचालही बंद झाली होती! वर लिहिलेले १४ शिपाई तटाजवळ जाऊन पोहोंचले तोंच, जाटांनीं, आंत भरून ठेविलेल्या दारूच्या कोठारास अकस्मात् आग लाविली; त्यामुळें इतका भयंकर स्फोट झाला कीं, डन् साहेबास आपल्या सैन्यासह प्राणरक्षणार्थ मागें पाय काढावा लागला! 'या प्रसंगाइतका भयंकर प्रसंग इंग्रजी सैन्यावर कधींही गुजरला नाहीं,' असें एक इंग्रज इतिहासकार लिहितो. या प्रसंगीं इंग्रजांचे २५ गोरे कामदार ( ऑफिसर्स ), ४९ गोरे शिपाई व ११३ काळे शिपाई ठार झाले, व १७६ गोरे व ५५६ काळे शिपाई जखमी झाले. या लढाईंतही, जाटांचा जय झाला.

---

## प्रकरण सातवें.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें जाटांनीं इंग्रजी सैन्याचा

तीन वेळ पराभव केला, तरीही इंग्रज सेनापति लॉर्ड लेक याचें धैर्य तिळमात्र खचलें नाहीं. तिसऱ्या खेपेस जर जाटांनीं आपल्या युद्धकौशल्याची शिकस्त करून इंग्रजी सैन्यास मागें हटविलें नसतें, तर त्याच वेळीं भरतपुर इंग्रजांच्या हातीं गेलें असतें, यांत बिलकूल संशय नाहीं. एकामागून एक असे तीन अपजय प्राप्त झाल्यामुळें इंग्रजीं सैन्य अगदीं निरुत्साह होऊन गेलें होतें, व त्याजवर अंमल चालविण्याचें काम फार कठिण झालें होतें. तथापि, सेनापति लॉर्ड लेक यानें कोणावरही न रागावतां आपल्या सर्व शिपायांस एकत्र करून, त्यांस मधुर शब्दांनीं ह्मटलें, ‘आज तुह्मांस जसा वाईट वेळ प्राप्त झाला आहे, तसा वाईट वेळ इंग्रजी सैन्यास आजपर्यंत कधींही प्राप्त झाला नव्हता. तुह्मीं, ‘ब्रिटिश सैन्य’ या नांवास जो कलंक लाविला आहे, तो आतां काढून टाकणें केवळ अशक्य झालें आहे. तुमच्या चुकीमुळें इंग्रजांस विजयलक्ष्मी सोडून गेली आहे. असो; गोष्ट होऊन गेली, त्याजबद्दल आतां पश्चात्ताप करून काय उपयोग? तथापि, आणखी एक वेळ, मोठ्या नेटानें किल्ला घेण्याचा प्रयत्न करावा, अशी माझी इच्छा आहे.’

सेनापतिसाहेबांचें हें मर्मस्पर्शी भाषण ऐकतांच, सर्व शिपाई अगदीं लज्जित व व्यथित होऊन खालीं माना घालून उभे राहिले. सर्वांनीं नव्या उत्साहानें पुनः युद्धांत शिरून प्राण देण्याची प्रतिज्ञा केली. लेफ्टनंट टेम्पल्टन् यानें सर्व सैन्याचें अग्रेसरत्व घेतलें. निराशारूपी अंधकारांत सर्व लोक चांचपडत पडले असतां, एकाएकीं उत्साहसूर्य उदय पावला, व त्याच्या प्रकाशानें पुनः भरतपुरावर चाल करण्याचा मार्ग दृग्गोचर होऊं लागला.

या वेळीं, तटाच्या पडक्या भागांतून आंत घुसण्याचें बिकट काम, ब्रिगेडियर मॅन्सन् याजवर सोंपविण्यांत आल्यामुळें, सर्व गोरे शिपाई व मुंबई व बंगाल खात्यांचें काळें पायदळ बरोबर घेऊन त्यानें खंदक ओलांडण्याचा प्रयत्न आरंभिला. तटाजवळील ज्या चौथऱ्यांवर तोफा चढवून जाटांनीं इंग्रजी सैन्याचा धुव्वा उडवून दिला होता, त्या चौथऱ्यांनजीकचा तट तुटून जाऊन तेथें एक मोठें खिंडार पडलें होतें. इंग्रजी सैन्य या ठिकाणीं येऊन पोहोंचलें व सर्वांनीं अशी घोर प्रतिज्ञा केली कीं, या खिंडारांतून आंत शिरून शहर हस्तगत करूं एक, किंवा तसें न झाल्यास मरून तरी जाऊं एक !

जाटांचा तोफा ठेवण्याचा बुरूज फार उंच होता. इंग्रजी सैन्यांतील सर्व वीरांनीं या चौथऱ्याच्या शिरोभागीं चढून जाण्याचा प्रयत्न एकसमयावच्छेदेंकरून सुरू केला. सैन्यांतील अनेक शिपाई एकाच्या खांद्यावर दुसरा, दुसऱ्याच्या खांद्यावर तिसरा, याप्रमाणें वर चढूं लागले ! कित्येक तटाच्या पडक्या भिंताडाच्या आधारानें वर चढूं लागले ! परंतु सर्व व्यर्थ ! तटांतील जाटांनीं, 'जयजय' शब्दाच्या घोषानें दशदिशा दणाणून टाकिल्या व लांकडांचे मोठमोठे तुकडे तटावरून खालीं लोटण्याचा सपाटा सुरू केला ! कितीएक जाटांनीं, इंग्रजी सैन्यावर बंदुकींच्या गोळ्यांचा भडिमार सारखा चालू ठेविला व कित्येकांनीं, मोठेमोठे दगडच खालीं लोटण्याचा सपाटा चालविला ! ! इकडे इंग्रजी तोफांच्या गोळ्यांनीं तटास जेथें भेगा-पडत चालल्या होत्या, तेथें त्या भेगांतून आंत शिरण्याचा कित्येक साहसी इंग्रजी शिपायांनीं प्रयत्न चालविला होता ! कितीएक शिपाई तर तटाच्या माथ्यापर्यंत चढले होते, परंतु जाटांच्या शस्त्रास्त्रांच्या माऱ्यानें त्यांस पटापट आपले प्राण सोडावे

लागले ! व त्यांचीं प्रेतें वरून खालीं पडूं लागल्यामुळें त्यांच्या धक्क्यानें वर चढणारे दुसरे अनेक शिपाई, धडाधड खालीं पडून तेथल्या तेथें गतप्राण होऊं लागले !

याच वेळीं दुसऱ्या एका चौथऱ्यावरून, जाटांनीं इंग्रजांवर गोळ्यांचा भडिमार चालविला होता. आपले अनेक शिपाई मेले आहेत व मरत आहेत असें पाहून इंग्रजी सैन्याची पांचांवर धारण बसली. अशा निरुत्साह प्रसंगीं, टेम्पल्टन् साहेबानें मोठ्या नेटानें पुढें चाल करितांच, पुनः इंग्रजी सैन्यांत आवेश उत्पन्न झाला. टेम्पल्टन् साहेब चौथऱ्याच्या अगदीं शिखरावर चढून गेला होता व तेथें त्यानें इंग्रजांचें निशाणही रोंविलें ! परंतु या त्याच्या साहसाचा परिणाम चांगला झाला नाहीं. त्यास जाटांच्या गोळीबारास बळी पडावें लागलें, व त्याचा साथीदार मेजर मॅनियन् हाही या प्रसंगीं आपल्या प्राणास मुकला.

अशा प्रकारचा भयंकर मुकाबला व मृत्यूची सजीव मूर्ति अवलोकन करूनही इंग्रजी सैन्यानें दुर्ग आक्रमण करण्याचा प्रयत्न सोडून दिला नाहीं. जेथें ज्या इंग्रेजी शिपायाला कांहीं आधार मिळाला, तेथून वर चढण्याचा आपला उद्योग त्यानें चालू ठेविला होता. परंतु जाटांची दृष्टि चुकवून तटावर चढून जाण्यांत एकासही यशःप्राप्ति झाली नाहीं. इंग्रज शिपाई वर चढतांना जाटांनीं पाहिला कीं, त्याला ठार मारून तटाखालीं लोटून दिलाच, असा प्रकार चालला होता. लांकडांचे मोठमोठे ओंडे तटावरून खालीं फेंकण्याचा तर जाटांनीं सपाटाच चालविला होता. शिवाय त्यांचा गोळीबारही चालूच होता. तथापि असल्या प्रयत्नांनीं होणाऱ्या इंग्रजी सैन्याच्या विध्वंसानें संतुष्ट न होतां, जाटांनीं आणखी एक भयंकर युक्ति योजून ती लागलीच अमलांत आणिली. मोठमोठ्या कढया तेलानें भरून विस्तवावर ठेविल्या, व

तेल तापून सळसळूं लागतांच तें मोठमोठ्या पिचकाऱ्यांत भरून त्याचा वर्षाव इंग्रजी सैन्यावर जाटांनीं सारखा सुरू केला ! या वर्षावानें, इंग्रजी सैन्यांत एकच गोंधळ उडून जात आहे तोंच, मातीच्या मडक्यांत दारू भरून त्यांस आग लावून, तीं मडकीं इंग्रजी सैन्यांत फेंकण्याचा जाटांनीं सपाटा चालविला ! ! हीं मडकीं, इंग्रजी शिपायांच्या मस्तकांवर पडून फुटूं लागल्यामुळें आंतील दारूच्या भडाक्यानें अनेक शिपाई जळून मरूं लागले, व जिकडे तिकडे एकच हाहाकार उडाला. इंग्रजी सैन्याचें युद्धक्षेत्र केवळ विषममृत्युमय अग्निक्षेत्र बनून गेलें ! विद्युत्पात झाल्यानें वृक्ष जसा कडकडून मोडून पडावा तसे इंग्रजी शिपाई या अग्निपातानें धारातीर्थीं पतन पावूं लागले. कोणी लांकडाचे ओंडे मस्तकावर आदळल्यामुळें जागच्या जागीं मरण पावले. कोणी, वणव्यांत सांपडून हरिण जसे भाजून मरतात, तसे तप्त तैलाच्या वर्षावानें भाजून मेले ! कोणी मेले आहेत, कोणी मृत्युपंथास लागले आहेत व कोणी मृत्यूची मार्गप्रतीक्षा करीत जमिनीवर पडून राहिले आहेत, असा शोकजनक देखावा इंग्रजी सैन्यांत दिसूं लागला. जाटांच्या या भयंकर अग्निवर्षावानें दोन तासांत अनेक शिपाई मृत्युमुखीं पडल्यावर, कर्नल मॅन्सन् यानें इंग्रजी सैन्यास, आपल्या गोटाकडे परत जाण्याचा एकदम हुकूम केला. या चौथ्या वेळींही पराजय प्राप्त झाल्यामुळें लज्जित होऊन इंग्रजी सैन्य, प्राणरक्षणार्थ पळून गेलें ! या प्रसंगीं इंग्रजांचे ६९ गोरे व ५६ काळे शिपाई मरण पावले व ४१० गोरे व ४५२ काळे शिपाई घायाळ झाले. याशिवाय ६ गोरे कामगार मारले गेले व २८ घायाळ झाले. एकंदरींत, या खेपेसही इंग्रजांस यश आलें नाहीं.

---

# प्रकरण आठवें.

इंग्रजी सैन्याचा चार वेळ पराभव झाल्यामुळें, भरतपुरांतील जाट लोकांत आनंदीआनंद होऊन गेला होता. इंग्रजी लष्करांत मात्र एकच हाहाःकार उडून जाऊन केवळ निराशेचा काळोख पसरला होता ! इकडे भरतपुर नगर विजयानंदरवानें दुमदुमून राहिलें होतें. पुनः पुनः चार वेळ, इंग्रजी सैन्यास माघार घ्यावी लागल्यामुळें, इंग्रजांचे ३,१०० योद्धे व शिपाई मेले होते व घायाळ झाले होते. ही संख्या इंग्रज इतिहासकारांनीं दिलेली आहे, परंतु जाट लोक असें सांगतात कीं, चार वेळ झालेल्या युद्धांत इंग्रजांचे अगणित वीर मेले होते, भरतपुर दुर्गासभोंवतालचा खंदक प्रेतांनीं भरून गेला होता, व त्या प्रेतांवरून, पाण्यास स्पर्श न करितां शहरांतील लष्करी लोक खंदक ओलांडून जात होते! एकंदरींत, इंग्रजांचें नुकसान कितीही झालेलें असो, परंतु जाटांनीं आपला चार वेळ पराभव केला, ही गोष्ट इंग्रज इतिहासकार प्रांजलपणें कबूल करितात. अशा प्रकारें पराजित होऊन हजारों शिपाई मरण पावल्यामुळें सेनापति लॉर्ड लेक याचें धैर्य अगदीं खचून गेलें! आतां करावें तरी काय, या विचारानें तो अगदीं हैराण झाला. दारूगोळा खलास झाला, तोफा अगदीं निरुपयोगी होऊन गेल्या, व अन्नसामुग्री तर अजीबाद संपली ! मग आग्र्याहून रसद आणविण्याची लॉर्ड लेक यानें तयारी चालविली. त्यानें बरेच दिवस विचार करून, पुनः एकवार जाटांशीं दोन हात करण्याचा निश्चय केला; परंतु इतक्यांत जाट सैन्यानें हल्ला करून इंग्रजांचा तोफखाना जाळून टाकिला, व लॉर्ड लेक यास आपली छावणी सोडून तटापासून सहा मैलांवर जाऊन राहणें भाग पडलें. लॉर्ड लेक साहेब शहरावर पुनः चाल करणार आहे,

हें वर्तमान ऐकतांच, भरतपुरचा राजा रणजितसिंह यास मोठी चिंता उत्पन्न झाली. त्याचा खजिना, या वेळीं, अगदीं रिकामा झाला होता, व पुष्कळ प्रजाजन इंग्रजांकडून मारले गेले होते, यामुळें आतां लढाई करण्याचा प्रसंग न येईल तर बरें असें त्यास वाटत होतें, व इंग्रजांशीं तह करून हें प्रकरण एकदांचें मिटवून टाकावें, अशा उद्देशानें त्यानें आपल्या तिसऱ्या मुलास लॉर्ड लेक याजकडे पाठविलें. लॉर्ड लेक यास तेंच पाहिजे होतें. त्यानें तहास तत्काळ आपली अनुमति दिली, व जाटांचा व इंग्रजांचा तह होऊन लढाईचा प्रसंग टळला. या तहाचीं कलमें येणेंप्रमाणें होतीं:—'डीग हा किल्ला सध्यां इंग्रजांच्या ताब्यांत आहे, परंतु महाराणा रणजितसिंह जर आजपासून इंग्रजांशीं मित्रत्वानें वागण्याचें कबूल करील तर हा किल्ला त्याचा त्यास परत दिला जाईल. इंग्रजांस विचारिल्याशिवाय रणजितसिंहानें, आपल्या लष्करांत दुसऱ्या कोणा युरोपियनास बिलकूल जागा देऊं नये. लढाईच्या खर्चाबद्दल जाटांनीं इंग्रजांस २० लक्ष रुपये द्यावे; यांपैकीं तीन लक्ष रुपये आज द्यावे व बाकी १७ लक्ष मागाहून द्यावे. या कलमाप्रमाणें आपण वागूं, याबद्दल जामीन ह्मणून महाराणा रणजितसिंहानें आपला एक पुत्र दिल्ली अथवा आग्रा येथील इंग्रज सेनापतींच्या स्वाधीन करावा.'

तहाचीं हीं सर्व कलमें, इंग्रजांस अनुकूल आहेत. चारी युद्धांत विजयी होऊनही, महाराणा रणजितसिंह यानें हीं कलमें कशीं मान्य केलीं, याचें मोठें आश्चर्य वाटतें. वास्तविक पाहतां, या वेळीं, जाटांचा पक्ष विजयी होता व ते ह्मणतील तसा तह करून देणें इंग्रजांस भाग पडलें असतें. असें दिसतें, परंतु ज्याअर्थीं प्रस्तुत तहाचीं कलमें जाटांस प्रतिकूल व इंग्रजांस अनुकूल अशीं दिसतात, त्या अर्थीं जाटांच्या जयाची जी गोष्ट लिहिली आहे, तींत बरीच अतिशयोक्ति असली पाहिजे.

तह झाल्यावर इंग्रजी सैन्य आपली छावणी सोडून निघून गेलें. लॉर्ड लेक साहेबानें आपल्या पराभवाचीं, खालीं दिलेलीं कारणें प्रसिद्ध केलीं.

'भरतपुर शहराची तटबंदी किती मजबूद आहे, हें आह्मांस मुळींच ठाऊक नव्हतें; भरतपुरच्या आसपासचा प्रदेश उच्च व नीच असा असल्यामुळें तेथें युद्ध करण्याचें काम फार बिकट आहे, व इंग्रजी सैन्याबरोबर एकही चांगला इंजिनीयर नव्हता.' लेक साहेबाच्या पराभवाचीं कोणतींही कारणें असोत, परंतु त्यामुळें हिंदुस्थानांतील इंग्रजांच्या इभ्रतीस तेव्हां मोठाच धक्का बसला. हिंदुस्थानांत, आपल्या राज्याचा प्रसार करण्याच्या कामीं, इंग्रजांस असें अपयश कधींच प्राप्त झालेलें नाहीं. हिंदुस्थानांतील अनेक राजांनीं हा कालपावेतों इंग्रजांशीं पुष्कळ लढाया केल्या, परंतु भरतपुरच्या महाराण्याप्रमाणें, त्यांतील एकासही विजय प्राप्त झाला नाहीं. या विजयामुळें महाराणा रणजितसिंह याचें महत्त्व इतकें वाढलें कीं, हा कोणी दैवी पुरुष आहे, असें लोक समजूं लागले.

या भरतपुर युद्धाच्या इतिहासांत, एका बंगाली बाबूची गोष्ट फार प्रसिद्ध व मनोरंजक आहे. या बाबूचें नांव कालीचरण घोस हें असून, तो, त्या वेळीं, लॉर्ड लेक साहेबाच्या कमिसारियट खात्यांत काम करीत असे. त्या वेळीं, आतांच्या सारखी शांतता नसून, देशांत जिकडे तिकडे, लढाया व दंगे चालू असत, व इंग्रजी सैन्यास तर शत्रूशीं सामना करण्याचे प्रसंग वरचेवर येत असत. असे अनेक प्रसंग पाहून व स्वतः बुद्धिमान् असल्यामुळें बाबू कालीचरण घोस कधीं कधीं समरांगणावर जाऊन आपलें शौर्य दाखवीत असे. भरतपुरचें युद्ध चालू असतां, एकदां असें झालें कीं, बाबूच्या पलटणीचा जनरल ( सेनापति ) जाटांकडून

मारला गेला, व त्याच्या हाताखालचें सैन्य सैरावैरा पळूं लागलें. हें पाहून बाबू साहेबांस असें वाटलें कीं, आतां हे सर्व लोक खास मारले जातात. मग बाबूनें, त्या पलटणींतील सर्व हवलदार व सुभेदार वगैरे प्रमुख लोकांस जवळ बोलाविलें, त्यांस धीर दिला, व आपण जनरलचा पोशाख करून व पळणाऱ्या सैन्यास मागें फिरवून, जाट लोकांच्या एका तुकडीवर हल्ला करून तिचा पराभव केला ! युद्ध संपल्यावर, लष्करी कायद्याप्रमाणें बाबूवर मोठा आरोप येऊन, लष्करी न्यायसभेपुढें त्याची चौकशी सुरू झाली. कारण, वरिष्ठाच्या आज्ञेशिवाय जनरलचा पोशाक करून लढणें, हा लष्करी कायद्याप्रमाणें मोठा अपराध समजला जातो. शेवटीं, चौकशी पुरी होऊन बाबूवर आरोप शाबीत झाला व त्याबद्दल त्यास ५०० रुपये दंड द्यावा लागला. पुढें, युद्धांत, चांगल्या प्रकारें कोण कोण लढले व जयप्राप्ति कोणाकोणास झाली, वगैरे चौकशी सुरू झाली, व तींत जाटांच्या एका तुकडीवर जय मिळविल्याबद्दल बाबू कालीचरण याचें नांव पुढें येऊन, लॉर्ड लेक साहेबानें त्याच्या शौर्याबद्दल व प्रसंगावधानाबद्दल त्यास ३०,००० रुपये बक्षीस दिले ! तेव्हांपासून इंग्रजी लष्करांतील लोक, 'जनरल कालीचरण घोस' या नांवानें त्यास हाक मारूं लागले ! एतद्देशीय लोकांमध्यें सेनापतीचें काम करण्याचें सामर्थ्य अद्याप कायम आहे, ह्याचें हें एक ठळक उदाहरण आहे.

---

## प्रकरण नववें.

महाराणा रणजितसिंह यास चार पुत्र होते. पहिला रणधीरसिंह, दुसरा बलदेवसिंह, तिसरा लक्ष्मणसिंह, व चौथा पार्थसिंह.

रणजितसिंह मरण पावल्यावर त्याचा वडील मुलगा रणधीरसिंह गादीवर बसला, परंतु तो लवकरच मेल्यामुळें व त्यास संतति नसल्यामुळें त्याचा दुसरा भाऊ बलदेवसिंह सिंहासनारूढ झाला. बलदेवसिंह मरण पावला त्या वेळीं, त्याचा पुत्र बलवंतसिंह हा अगदीं लहान होता. बलदेवसिंह जीवंत असतांना त्यास असा संशय उत्पन्न झाला कीं, आपल्या पश्चात्, आपल्या घराण्यांतील इतर लोक आपल्या मुलास गादीवर बसूं देणार नाहींत, व यासाठीं त्यानें इंग्रज सरकारास, आपण मेल्यावर आपल्या मुलास गादीवर बसविण्याची विनंति केली होती. त्याप्रमाणें, बलदेवसिंह मृत्यु पावल्यावर, इंग्रजांनीं त्याचा मुलगा बलवंतसिंह यास भरतपुरच्या गादीवर बसविलें. भरतपुरच्या युद्धाचा, इ. स. १८०५ त, तह होऊन निकाल झाल्यावर, इ. स. १८२५ पर्यंतच्या वीस वर्षांत, भरतपुराशीं इंग्रजसरकारचा कोणत्याही प्रकारचा संबंध नव्हता, तो बलवंतसिंह यास त्यांनीं गादीवर बसविल्यामुळें पुनः उत्पन्न झाला. इ. स. १८२५ च्या मार्च महिन्यांत, भरतपुर शहरांत एक अघटित घटना घडून आली. स्वर्गवासी महाराणा रणजितसिंह याचा तिसरा मुलगा लक्ष्मणसिंह याचा मुलगा मधुसिंह यानें राजघराण्यांतील इतर लोकांच्या साहाय्यानें, बलवंतसिंहास पदच्युत करण्याचा बेत केला. या आपसांतील वैषम्यामुळें, भरतपुरच्या राजवंशास फार शोचनीय स्थिति प्राप्त झाली. मधुसिंह हा भरतपुरांतील सर्व राजद्रोही लोकांचा पुढारी बनला, व तो बलवंतासिंहास आतां पदच्युत करणार इतक्यांत, त्याचा महत्वाकांक्षी व शूर वडील भाऊ दुर्जनसाल यास सिंहासनारूढ होण्याची इच्छा उत्पन्न झाली, व त्यानें बलवंतसिंहाची आई व राजवंशांतील तत्पक्षीय इतर लोक या सर्वांची कत्तल उडविली ! येवढें झाल्यावर, भरतपुरचें राज्य

दुर्जनसाल याच्या हातीं आलें, हें उघडच आहे. इंग्रजांचें ह्मणणें असें होतें कीं, बलवंतसिंह हा सिंहासनाचा खरा अधिकारी असून ज्या अर्थीं त्याचा बाप बलदेवसिंह याच्या अनुमतानें, आह्मीं त्यास भरतपुरच्या गादीवर बसविलें आहे, त्या अर्थीं त्याचें संरक्षण करणें हें आमचें कर्तव्यकर्म होय. दुर्जनसालाचें ह्मणणें असें होतें कीं, माझा चुलता रणधीरसिंह यास संतति नसल्यामुळें मला दत्तक घेऊन गादीचा वारस करण्याचा त्याचा विचार होता, परंतु तो अकस्मात् मरण पावल्यामुळें, हा त्याचा विचार अंमलांत आला नाहीं. तथापि, ज्या अर्थीं मला दत्तक घेण्याचा त्याचा विचार होता, त्याअर्थीं गादीचा खरा अधिकारी मीच आहें. शिवाय आपल्या पश्चात, बलवंतसिंह यास गादीवर बसविण्याविषयीं बलदेवसिंहानें आपणास विनंति केली होती, असें जें इंग्रज ह्मणतात तें सर्व झूट असून, बलदेवसिंहाचाही विचार मलाच गादी देण्याचा होता.

दुर्जनसालाचें वरील विधान ऐकून इंग्रजांस मोठा राग आला व त्याचें पारिपत्य करावें ह्मणून भरतपुर शहरावर पुनः हल्ला करण्याचा त्यांनीं निश्चय केला. या वेळीं, इंग्रजी सैन्याचें प्रमुखत्व, दिल्ली येथील तत्कालीन रेसिडेन्ट सर डेव्हिड् आक्टरलोनी याजकडे देण्यांत आलें होतें. दुर्जनसालानें असा विचार केला कीं, बलशाली इंग्रजांशीं युद्ध करावें लागल्यास त्यांत आपला निभाव लागणें कठिण, व यासाठीं युक्तिप्रयुक्तीनें व नम्रतेनें इंग्रजांस अनुकूल करून घेण्याचा त्यानें प्रयत्न आरंभिला. इंग्रजांनीं, दुर्जनसाल यानें आपल्या चुलत्याचा खून केला, असा त्याजवर आरोप ठेविला होता व राजवाड्यांतील इतर लोकांची कत्तल केल्याबद्दल इंग्रजांचा त्याजवर मोठा रोष झाला होता. दुर्जनसालानें सर आक्टरलोनी याजकडे आपला वकील पाठवून

त्यास असें कळविलें कीं, तुमचा मजवर जो रोष झाला आहे, त्याजबद्दल मी फार दिलगीर आहें. वास्तविक पाहिलें असतां, भरतपुरच्या राजवाड्यांत जीं कांहीं अनन्वित कृत्यें व रक्तपात झाले, त्यांच्याशीं माझा कोणत्याही प्रकारचा संबंध नव्हता. येवढेंच नव्हे, तर तीं कृत्यें घडून येईपर्यंत मला त्यांतलें कांहींएक ठाऊक नव्हतें! राजाच्या चुलत्याचा वध मीं केलेला नसून, तो मारला जाण्यास त्याचीं स्वतःचीं राक्षसी कृत्येंच कारण झालेलीं आहेत. लोक त्याच्या अत्याचारास कंटाळून गेले व शेवटीं त्यांनीं त्यास देहान्त प्रायश्चित्त दिलें! त्याच्या वधाशीं माझा बिलकूल संबंध नव्हता.

सर आक्टरलोनी यानें, दुर्जनसालाच्या या खुलाशावर, बिलकूल विश्वास ठेविला नाहीं; तेव्हां निराश होऊन दुर्जनसालाच्या वकिलानें, आक्टरलोनी साहेबास विनयपूर्वक विनंति केली कीं, आमचें भाषण तुह्मी सत्य मानीत नाहीं किंवा तुमच्या सार्वभौमत्वाच्या कबुलीचे कागदपत्र आह्मी तुह्मांस द्यावयास तयार आहों, त्यांचाही तुह्मी स्वीकार करीत नाहीं; तस्मात्, आह्मीं आतां पुढें काय करावें, हें तुह्मीच आह्मांस सांगा. जर आह्मांस तुह्मांकडून अद्याप थोडी मुदत देण्यांत येईल, तर आमच्या भाषणाची सत्यता पुराव्यानिशीं तुमच्या निदर्शनास आणून द्यावयास आह्मी तयार आहों. याकरितां माझी आपणास हात जोडून प्रार्थना आहे कीं, घाईनें युद्धाचा प्रसंग आणून विनाकारण आमच्या राज्याचा नाश करूं नये, व गरीब बिचाऱ्या शिपायांस मरणाच्या तोंडीं देऊं नये; तर, तुह्मीं स्वतः या गोष्टीचा चांगला विचार करून व उभय पक्षांचा समेट करून तंट्याचें बीज काढून टाकावें, हें अधिक श्रेयस्कर व मुत्सद्देगिरीस शोभण्यासारखें होय. आक्टरलोनी साहेबानें विचार केला कीं, युद्धा-

ची तयारी करावयास आपणास वेळ मिळावा याच उद्देशानें हें तहाचें थोतांड उभें करून, दुर्जनसालाचा वकील इतका विनय दाखवीत आहे व राजनीतीच्या लांब लांब गोष्टी सांगत आहे; याशिवाय, असें करण्यांत त्याचा दुसरा हेतु बिलकूल नसावा. मग त्यानें वकिलाचें बोलणें अमान्य करून त्यास निरोप दिला, व लढाई करण्याच्या हेतूनें तो सैन्याची जमवाजमव करूं लागला. सैन्य गोळा करण्याचें काम मेजर जनरल रेनेल याजकडे सोंपविण्यांत आलें होतें.

---

## प्रकरण दाहावें.

कित्येक इंग्रज ग्रंथकार असें लिहितात कीं, 'जर दुर्जनसाल भरतपुरच्या राज्याशीं असलेला आपला संबंध सोडून द्यावयास कबूल असेल, तर युद्ध करावें कीं न करावें याबद्दलचा विचार करण्यांत येईल,' असें आक्टरलोनी साहेबानें दुर्जनसालाच्या वकिलास सांगितलें होतें. साहेबाचें हें मत त्या वकिलास पसंत पडलें नाहीं, व त्याप्रमाणें त्यानें दुर्जनसाल यास लिहून कळविलें. तहाचें कार्य वकिलाकडून घडणें अशक्य वाटल्यामुळें, दुर्जनसाल यानें, राजा बलवंतसिंह यास बरोबर घेऊन, स्वतः आक्टरलोनी साहेबास भेटण्याचा बेत केला होता व, हा बेत आक्टरलोनी साहेबासही पसंत पडला होता; परंतु कांहीं कारणामुळें तो शेवटीं सिद्धीस गेला नाहीं. असें होण्याचें कारण काय होतें, याचा कोणत्याही इतिहासांत उल्लेख केलेला नाहीं. दुर्जनसाल हा भरतपुरच्या राज्यांत मोठा पराक्रमी व साहसी पुरुष असल्यामुळें, भरतपुरच्या गादीशीं असलेला आपला संबंध तोडून टाकावयास तो एकाएकीं कबूल झाला नाहीं, तर त्यांत कांहीं मोठेंसें आश्चर्य नाहीं.

जाट लोकांस युद्धाची तयारी करावयास वेळ मिळूं न देतां, भरतपुर शहरावर झटपट हल्ला करून दुर्जनसालाची खोड मोडावी, अशी आक्टरलोनी साहेबाची इच्छा होती; परंतु शेवटीं ती पूर्ण झाली नाहीं. इंग्रजांनीं लढाईची सर्व तयारी केली होती, इतक्यांत ब्रिटिश सरकारानें असा हुकूम केला कीं, लढाईचें काम एकदम बंद करावें. या हुकुमानंतर, १८२५ च्या डिसेंबर महिन्यापर्यंत, सर्वत्र सामसूम होतें. कांहीं महिने तर असे गेले कीं, त्या वेळीं, जाटांचें व इंग्रजांचें आतां लवकरच युद्ध होणार, अशी कोणास कल्पनाही झाली नसती! राज्यकारभार अगदीं सुरळीतपणें चालला होता. मध्यंतरीं सर आक्टरलोनी मरण पावला, व त्याचे जागीं सर चार्लस मेटकॉफ यास दिल्लीचा रेसिडेंट नेमण्यांत आलें. त्यानें, इ० स० १८२५ ता० २५ नोवेंबर, या दिवशीं, 'आह्मी लवकरच भरतपुरावर हल्ला करणार,' अशा अर्थाचा एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. असें करण्याचें कारण काय होतें, हें एकही इंग्रज इतिहासकार सांगत नाहीं. भरतपुर शहरांत कोणत्याही प्रकारची गडबड चालू नसतां, व जाटांचें इंग्रजांशीं मित्रत्वाचें वर्तन असतां, लढाई उपस्थित करून शांततेचा भंग करण्याचें इंग्रजांस काय प्रयोजन होतें, याचा इंग्रज इतिहासकारांनीं स्पष्ट खुलासा करावयास पाहिजे होता. परंतु, वस्तुस्थिति ज्याअर्थीं तशी नाहीं आहे, त्याअर्थीं असें ह्मणावें लागतें कीं, तें राजकारण फार खोल असलें पाहिजे, ह्मणून तें बाहेर पडलें नाहीं. तें राजकारण भरतपुरपक्षीं होतें कीं इंग्लिशपक्षीं होतें, ह्याचा देखील कोठें मागमूस नाहीं. तेथें इतिहासकारांनीं काय करावें?

मेटकॉफ साहेबाचा जाहीरनामा येणेंप्रमाणें होताः—

" After the death of Maharaja Baldeosingh, Kour Doorjunsal the son of Luchmun-

singh usurped the Principality and assumed the power, rank and title of the Rajah.

The interference of the British Government became necessary and indispensable, for the protection of rights of the Lawful Rajah, Maharaja Balwantsingh.

Kour Doorjansal pretends unjustly that the Principality belongs to him on the ground, that it was the intention of the Rajah Rundheersingh to have adopted him as his son, but Rajah Rundheersingh did not actually adopt him, the alleged intention, whether it did or did not exist, cannot confer any just claim. The British Government has therefore called on Doorjansal to surrender the Principality of the Lawful Rajah and to retire on a suitable provision into the British Dominions under a Guarantee from the British Government for all his rights present or future. If he persists in opposition to these proposals, the British Government must perform its duty."

(Sd.) C. T. METCALFE,
Resident,
Delhi Residency,
25 th November 1825.

या जाहिरनाम्याचा भावार्थ येवढाच आहे कीं, दुर्जनसालानें, बलवंतसिंहास पदच्युत करून भरतपुरची गादी अन्यायानें बळकाविली आहे, यामुळें, बलवंतसिंहास गादीवर बसविण्याकरितां, भरतपुरावर चाल करून जाणें आह्मांस भाग पडत आहे.

वास्तविक पाहतां बलवंतसिंहास गादी देण्याच्या निमित्तानें लढाईचा प्रसंग आणण्याचें इंग्रजांस मुळींच प्रयोजन नव्हतें. भरतपुरकर व इंग्रज यांजमध्यें झालेल्या तहाप्रमाणें या वेळीं, इंग्रजांनीं स्वस्थ बसावयास पाहिजे होतें. सिंहासनाकरितां जो झगडा सुरू झाला, तो भरतपुरच्या राज्यांत सुरू झाला होता. त्याशीं इंग्रजांचा कोणत्याही प्रकारचा संबंध नव्हता. ज्या वेळीं बलदेवसिंहानें, आपल्या मागें, आपला मुलगा बलवंतसिंह यास गादीवर बसविण्याविषयीं इंग्रजांस विनंती केली होती, त्या वेळीं ती विनंती त्यांनीं अमान्य करावयास पाहिजे होती, व तसें करावयास त्यांजपाशीं बळकट कारणेंही होतीं. त्यांनीं बलदेवसिंहास असें सांगितलें पाहिजे होतें कीं, बलदेवसिंहजी, तुमच्या मागें तुमच्या मुलास गादी मिळावी अशी जर तुमची इच्छा आहे, तर त्या संबंधानें सर्व व्यवस्था करावयास तुह्मी स्वतः मुखत्यार आहां. तुमचा पिता रणजितसिंह याशीं जो आमचा तह झालेला आहे त्या तहाप्रमाणें, तुमच्या राज्यांतील खाजगी गोष्टींत ढवळाढवळ करण्याचा आह्मांस बिलकूल अधिकार नाहीं, व झालेला तह मोडून तुमची विनंती मान्य करणें हेंही सर्वथा अनुचित होय. खरोखरच, इंग्रजांनीं बलदेवसिंहास जर या प्रमाणें सरळ उत्तर देऊन, भरतपुरच्या राज्यकारभारांत आपणांस गोंधळ घालितां यावा ह्मणून, लढाई सुरू केली नसती, तर त्यांच्या मनाचा मोठेपणा व व्यवहाराचा प्रामाणिकपणा स्पष्ट दिसून आला असता, व त्याबद्दल इतिहासकारांनीं त्यांची स्तुति

गाइली असती; परंतु तसें झालें नाहीं. त्या भानगडींत खरा प्रकार काय आहे तो कळत नाहीं. बाकी, राजकारणांत लोभ तर बुडीं नेहमीं असतोच. असो.

भरतपुरावर हल्ला करण्याची इंग्रजांनीं तयारी चालविली आहे, ही हकीकत दुर्जनसालास समजली तेव्हां त्यास असें वाटलें कीं, आज नाहीं उद्यां केव्हां तरी इंग्रजांशीं दोन हात करण्याचा आपणास प्रसंग येणार खास. मग, त्यानेंही लढाईची तयारी मोठ्या जोरानें चालविली. आरंभीं इंग्रजांनीं लढाईची तयारी केली होती, परंतु लढाई करूं नये असा वरिष्ठ सरकारचा अकस्मात् हुकूम आल्यामुळें, पुढें तें प्रकरण थंड पडल्यासारखें झालें होतें व पुनः जिकडे तिकडे चांगली शांतता झाली होती. तेवढ्या वेळांत दुर्जनसालानें आपल्या सैन्याची चांगली तयारी केली होती व तो लढाईची अगदीं वाट पहात बसला होता. त्यानें आपल्या विश्वासाच्या लोकांस आपल्या सैन्यांत मोठमोठ्या जागा दिल्या होत्या, नवीन लोकांची भरती केली होती व अन्नसामुग्रीचाही भरपूर सांठा करून ठेविला होता. परंतु कोणत्याही युरोपियनास आपल्या लष्करांत नोकरीस ठेवूं नये, असें जें रणजितसिंह व इंग्रज यांजमध्यें झालेल्या तहाचें एक कलम होतें त्याच्या विरुद्ध मात्र त्यानें बिलकूल वर्तन केलें नाहीं.

दुर्जनसालानें आपल्या चुलत्याचा खून केला होता कीं तो दुसऱ्या कोणीं केला होता, याबद्दलचा कांहींच पुरावा पुढें आला नव्हता. त्यानें भरतपुरचें राज्य जरी पूर्णपणें आपल्या ताब्यांत घेतलें होतें, तरी आपल्या मागें 'राजा' हा किताब धारण केला नव्हता. वास्तविक पाहतां, दुर्जनसाल ह्मणजे कांहीं सामान्य प्रतीचा मनुष्य नव्हता, तर तो मोठा शक्तिमान् व साहसी पुरुष होता. सर्व राज्य त्याच्या हातीं आल्यामुळें तो शक्तिमान् झाला होता

असें नव्हे, तर तो मूळचाच तसा होता, व त्यावरून त्यानें कांहीं दिवस तरी राज्यसुखाचा अनुभव घ्यावा, असा ईश्वरी संकेतच होता, असें दिसतें. भरतपुर शहरांतील बहुतेक सरदार त्यानें वश करून घेतले होते. जाट सैन्यावर त्याचा मोठा दरारा होता, व त्या वेळचा प्रसिद्ध जाट योद्धा खुरासलसिंह व जयपुरचा विद्वान् पुरोहित नंदकुमार, हे त्याचे परममित्र होते. नंदकुमार यास राजपुतान्यांत त्या वेळीं मोठा मान होता, व सर्व लोकांवर त्याचें मोठें वजन होतें. रजपुत व जाट लोक त्यास 'श्रीजी' असें ह्मणत असत. याशिवाय भरतपुरचे साहसी सरदार कीर्तनराम व कीर्तनवल्लभ हे दुर्जनसालाचे मोठे पक्षपाती असून, त्यानें हातीं घेतलेल्या प्रत्येक कामांत ते त्यास मनापासून साहाय्य करीत असत. एकंदरींत या सर्व प्रकारच्या अनुकूलतेमुळें दुर्जनसालाची लढाईची तयारी अगदीं पूर्णावस्थेस पोंचली होती. भरतपुरच्या किल्ल्यांत २०,००० पायदळ असून त्यांतील ८,००० शिपाई तर चांगले युद्धनिपुण होते. बाकीच्या शिपायांची नुकतीच भरती केलेली असल्यामुळें त्यांस इतकें चांगलें शिक्षण मिळालें नव्हतें.

याप्रमाणें युद्धाची तयारी जरी अगदीं चांगली झाली होती, तरी ज्या ऐक्याच्या अभावामुळें हिंदुस्थान देशास आज ही अवनति प्राप्त झालेली आहे, तें ऐक्य नसल्यामुळें भरतपुरकरांचा पक्ष या वेळीं एक प्रकारें कमजोर झालेला होता. पूर्वीं, त्यांच्या इंग्रजांशीं ज्या लढाया झाल्या, त्या वेळीं भरतपुरच्या राज्यांतील रावापासून रंकापर्यंत सर्व लोक स्वराज्यरक्षणार्थ जिवावर उदार होऊन लढत होते व त्यामुळेंच इंग्रजांसारख्या बलाढ्य शत्रूशीं दोन हात करण्यास ते समर्थ झाले; परंतु या वेळीं लोकांची एकवाक्यता नष्ट झाली होती, व अनेक जाट लोक इंग्रजांस

आंतून फितुर झाले होते. जाटांचें गृहच्छिद्र जाणण्याच्या कामीं या नीच लोकांचा इंग्रजांस चांगलाच उपयोग झाला. मागील युद्धांत, इंग्रजी सैन्याची व्यवस्था बराबर नसल्यामुळें त्यांस माघार घ्यावी लागली होती, परंतु या प्रसंगीं तसें न व्हावें ह्मणून इंग्रजी सेनापतीनें आपल्या सैन्याची व अन्नसामुग्रीची व्यवस्था उत्तम प्रकारें ठेविली होती. जनरल कोंबरमीर यास इंग्रजी सैन्याच्या सेनापतीची जागा देण्यांत आली होती. त्यानें आपल्याबरोबर १६२ तोफा घेतल्या होत्या. चांगल्या इंजिनियरांच्या अभावामुळें मागील युद्धांत अपजय सोसावा लागला असें लार्ड लेक यानें विधान केलें होतें. परंतु, या वेळीं असलीं विधानें करून वेळ मारून नेण्यास जागा राहूं नये ह्मणून चांगले नामांकित इंजिनीयर इंग्रजी सैन्याबरोबर देण्यांत आले होते. तापलेलें दूध पितांना तोंड भाजल्यामुळें दहीं फुंकून खाणाऱ्या गृहस्थाप्रमाणें इंग्रजांची या वेळीं स्थिति झाली होती. एक वेळ चांगली ठोकर लागल्यामुळें ते आतां दुप्पट शाहाणे झाले होते, व या युद्धांत जाटांचा आपण पुरा मोड करूं अशी त्यांची खात्री होती.

इंग्रजी सेनापति लार्ड कोंबरमीर यानें, इ० स० १८२५, ता० ९ डिसेंबर रोजीं, आपल्या लष्कराची पहिली तुकडी भरतपुराकडे रवाना केली व त्या तुकडींतील योद्धे जनरल रेनेल व स्ले हे भरतपुर शहराच्या उत्तर व पश्चिम या दिशांच्या मध्यें एका जागीं खंदक खणून आपापल्या सैन्यासह मोठ्या बंदोबस्तानें राहिले. भरतपुरच्या तटाबाहेरील खंदकांतील पाणी कमी व्हावें ह्मणून इंग्रजांनीं एक नवीच युक्ति अमलांत आणिली होती. मागील युद्धांत, या खंदकांतील दुस्तर जलप्रवाहामुळें इंग्रजांची फार खराबी झाली होती. परंतु या खेपेस तशी खराबी

न व्हावी ह्मणून, त्यांनीं एक मोठा बांध घालून खंदकांत जाणारें पाणी अडवून टाकिलें. भरतपुरांतील जाट लोकांनीं खंदकांत पाणी सोडण्याचें काम सुरू केलें होतें, परंतु या इंग्रजी बांधामुळें तें काम पूर्णतेस जाणें अशक्य झालें.

तटाबाहेर इंग्रजी सैन्य जमा झालेलें पाहतांच, खंदकांत पाणी सोडणारे जाट शिपाई शहरांत निघून गेले. इकडे इंग्रजी सैन्य, अगदीं तटास येऊन भिडलें व त्यामुळें भरतपुरांतील नागरिक लोक बियाना, डीग, बलमपाड, कुम्भीर वगैरे ठिकाणीं पळत सुटले ! इंग्रजी सैन्याचें साहस पाहतांच जाट शिपाई सावध झाले व त्यांनीं तटावरील तोफा इंग्रजी सैन्यावर सोडण्यास प्रारंभ केला. या माऱ्यानें इंग्रजांचें ह्मणण्यासारखें नुकसान झालें नाहीं; फक्त बड्या इंजिनीयर साहेबांचा एक हात असा उडून गेला कीं त्याचें चिन्हही राहिलें नाहीं!!

ता० ११ डिसेंबर रोजीं जनरल निकलस हा भरतपुरापासून ७ मैलांवर, 'उंचा' या नांवाचा एक गांव आहे, तिकडून भरतपुराकडे येऊं लागला. लेफ्टनंट कर्नल फेथफुल हा 'माली' नामक गांवावरून भरतपुराकडे येऊं लागला. तेव्हां त्याचें लष्कर पाहतांच ग्रामवासी लोक आपापलीं घरेंदारें सोडून पळून गेले! 'माली' गांवांतून, भरतपुरचा तट कोणत्या स्थितींत आहे, हें सहज समजण्यासारखें होतें. तेथील इंग्रजी सैन्यानें गांवाच्या एका बाजूस एक मोठा खंदक खणला व बाकी तीन बाजूंस झाडें व कांटे घालून जाट लोकांस आंत प्रवेश करितां न येईल असा कडेकोट बंदोबस्त केला. पुढें ता० २६ डिसेंबर रोजीं, कर्नल फेथफुल साहेब माली गांव सोडून बराच पुढें आला व शहराबाहेरील एक मजबूद ठिकाण त्यानें आपल्या ताब्यांत घेतलें. या ठिकाणासही त्यानें तटबंदी करविली होती.

१८ डिसेंबरपावेतों, या सैन्याच्या हालचालीसंबंधानें महत्वाचें असें कांहींच घडलें नाहीं. भरतपुरांतील जाट सैन्यानें, आपल्याकडून होण्यासारखी होती तेवढी तटाची मजबुदी करून ठेविली होती. ही मजबुदी करण्याचें काम चालू असतां, इंग्रजांनीं एकदां दुर्गभेद करण्याचा प्रयत्न केला होता, परंतु, जाटांनीं तटावरून तोफांचा भयंकर मारा सुरू केल्यामुळें, तो सिद्धीस गेला नाहीं. या प्रयत्नांत इंग्रजांचे ४०–५० लोक मात्र निरर्थक प्राणास मुकले. आणखी एके दिवशीं जाटांनीं तटाचे बाहेर पडून इंग्रजांवर हल्ला केला होता, परंतु इंग्रजांच्या कांहीं गायी व म्हैशी हांकून नेण्यापलीकडे त्यांच्या हातून विशेष कांहीं झालें नाहीं.

ता० १९ डिसेंबर रोजीं इंग्रजी सैन्याच्या युद्धसामुग्रीवर भरतपुरकरांनीं एक जोराचा हल्ला केला होता. परंतु इंग्रजांकडील एका जमादारानें मोठ्या शौर्यानें लढून तिचें रक्षण केलें. या त्याच्या बहादुरीबद्दल लॉर्ड कोंबरमीर यानें त्याची फार प्रशंसा केली. ता० २१ रोजीं, जाटांनीं तटावरून इंग्रजी सैन्यावर पुनः तोफा डागल्या होत्या व इंग्रजांकडूनही उलट तोफांचा मारा करण्यांत आला होता. या युद्धांत ५० जाट लोक प्राणास मुकले. याच दिवशीं लॉर्ड कोंबरमीर यानें दुर्जनसालास लिहून कळविलें कीं, किल्ल्यांतील स्त्रिया व मुलें यांस २४ तासांचे आंत बाहेर काढून सुरक्षित ठिकाणीं नेऊन ठेवा. ही मुदत संपतांच आह्मी शहरावर मारा करणार आहों. या पत्रास दुर्जनसालानें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

ता० २४ डिसेंबरपासून, तटावर तोफांचे गोळे फेंकण्यास इंग्रजांनीं सुरुवात केली. या दिवशीं, इंग्रजी तोफांचे गोळे भरतपुरच्या तटावर येऊन धडाधड आपटत होते. भरतपुरकरांचा

तोफखाना बंद झाल्यावर, इंग्रजांनीं तटांत शिरण्याकरितां रस्ता बांधण्याचें काम सुरू केलें. रात्रौ पुनः जाटांचा मारा चालूच होता. ता० २५ डिसेंबर रोजीं रात्रीं, एका ख्रिस्ती सणानिमित्त इंग्रजी सैन्य मोठ्या आनंदांत असतां, भरतपुरकरांनीं त्यावर एकाएकीं हल्ला केला, परंतु त्यांच्या इच्छेप्रमाणें कार्यभाग घडून आला नाहीं. ता० २६ डिसेंबर रोजीं, इंग्रजी सैन्यांतून पुनः तोफांचे गोळे भरतपुराकडे येऊं लागले. या गोळ्यांनीं तटाचा पूर्वेकडील बराच मोठा भाग तुटून पडला होता. याच दिवशीं रात्रीं, बलदेवसिंहाच्या बगीच्यांतील इंग्रजांवर जाटांनीं हल्ला केला होता. लढाई झाली; परंतु त्यांत कोणाचेंही ह्मणण्यासारखें नुकसान झालें नाहीं. शहराच्या उत्तरेकडील जागीं तोफा ठेवण्याकरितां इंग्रज लोक मोर्चा बांधित असतां, भरतपुरकरांनीं त्यांस पळवून लाविलें होतें. तेव्हांपासून ता० ३१ डिसेंबर पर्यंत, दोन्ही पक्षांच्या तोफा एकसारख्या चालू होत्या. हर्बर्ट या नांवाचा एक इंग्रज गोलंदाज जाटांस येऊन मिळाला होता. या फितुरी माणसाच्या सांगण्यावरून, जाटांनीं इंग्रजी सेनापतीच्या सैन्यावर तोफा डागिल्या, परंतु त्याचा एक खिदमतगार मरण्यापलीकडे त्याचें कांहीं विशेष नुकसान झालें नाहीं.

यानंतर १८ दिवस, इंग्रजांची व जाटांची लढाई एकसारखी चालू होती. सन १८२६ ता० १ जानेवारी रोजीं, इंग्रजांनीं भरतपुरच्या तटाबाहेरील खंदकापर्यंत एक सडक तयार केली. ही सडक अशा प्रकारें बांधिली होती कीं, तिजवरून जाणारें इंग्रजी सैन्य जाटांच्या बिलकूल दृष्टीस पडूं नये. या सडकेनें येऊन इंग्रजी सैन्यानें, तटाजवळ एक मोठा सुरुंग तयार केला होता, परंतु इंग्रजांची ही सर्व हातचलाखी जाटांच्या तत्काळ ध्यानांत आली. त्यांनीं त्यांजवर तोफांचा असा भयंकर मारा

चालविला कीं, सुरुंग तयार करणाऱ्या इंग्रजी शिपायांचा सरदार लेफ्टनंट टिंडाल हा ठार झाला! याच दिवशीं, तटाच्या उत्तर व पश्चिम या दिशांच्या मध्यें इंग्रजांनीं तोफा ठेवण्याकरितां एक बुरुज बांधिला.

ता० २ रोजीं, इंग्रज या बुरुजावरून तोफा डागूं लागले. किल्ल्यांतील जाट लोकही आपल्या तोफांकडून त्यांस जबाब देऊं लागले. सगळा दिवस व सगळी रात्र दोघांच्याही तोफा चालू होत्या. जाट लोक तोफा डागण्यांत गुंतले आहेत असें पाहून इंग्रजांनीं सुरुंगाचें काम पुनः सुरू करून तें बहुतेक पुरें केलें.

ता० ३ जानेवारी रोजीं, इंग्रजांच्या इंजिनीअर खात्यांतील लोकांवर कांहीं जाट शिपायांनीं हल्ला करून त्यांची एकसहा कत्तल उडविली! या दिवशीं इंग्रजांनींही जाटांवर रागानें आपल्या तोफा चालविल्या. रात्रीच्या वेळीं सुरुंगाचा कांहीं भाग पुरा करण्यांत आला. ता० ४ रोजीं इंग्रजी तोफांच्या भयंकर माऱ्यानें तटाचा बराच भाग तुटून पडला, विशेषतः दक्षिणेच्या बाजूचा भाग तुटून तेथें मोठेंच खिंडार पडलें होतें. तोफांच्या घनघोर गर्जनेनें सारें भरतपुर शहर अगदीं दुमदुमून गेलें होतें, व आकाश धूम्रमय होऊन गेलें होतें. ता० ५ रोजीं, तटास पडलेल्या खिंडारांतून शहरांत शिरण्याची इंग्रजांनीं तयारी केली. खिंडारापाशीं जमा झालेल्या जाट सैन्याची फळी फोडून आंत घुसण्यास इंग्रजी सैन्य अगदीं उत्सुक झालें होतें. या झटापटींत, जाटांशीं हातघाई करण्याचा प्रसंग आल्यामुळें इंग्रजांचे ५२० लोक मरण पावले! रात्रौ साडे आठ वाजतां, कांहीं साहसी जाट वीर शहराबाहेर आले व बुरुजापाशीं असलेल्या शत्रुसैन्यावर वाघासारखे तुटून पडले. उभयपक्षांची मोठी लढाई झाली व दोघांचेंही बहुत नुकसान झालें. या लढाईंत इंग्रजांची एक

तोफ अकस्मात् फुटल्यामुळें पांच सात इंग्रज गोलंदाजांचे राई-एवढे तुकडे झाले! शेवटीं किल्ल्यांत शिरण्याचें काम सोडून देणें इंग्रजांस भाग पडलें !!

ता० ६ जानेवारी रोजीं, इंग्रजांनीं पुनः किल्ल्यांत शिरण्याचा उद्योग आरंभिला. खंदकावर पूल बांधिला होता, त्यावरून तटाजवळ येऊन पाहतां त्यांस असें आढळलें कीं, तटास जें खिंडार पडलें आहे, तें फार उंच असल्यामुळें, तेथवर चढून तटांत शिरणें हें मोठ्या मुष्किलीचें काम आहे. मग त्यांनीं खंदकाच्या कांठीं मोठमोठे खड्डे खणून त्यांत दारू भरून ठेविली व त्यांस आग लावून दिली! परंतु, या उपायानें तटाच्या केंसाएवढ्या भागासही धक्का पोंचला नाहीं. ता० ७ रोजीं, लॉर्ड कोंबरमीर आपल्या सैन्याचें युद्धकौशल्य पाहून फार खूष झाला व त्यानें मोठ्या उत्तेजक शब्दांनीं आपल्या सैनिकांस तटाच्या आंत घुसण्याचा हुकुम केला. सेनापतीच्या आज्ञेप्रमाणें शिपायांनींही शहरांत शिरण्याच्या कामीं आपल्या शौर्याची अगदीं शिकस्त केली, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. सुरुंगास आग लावीत असतां एका साहसी जमादाराचें सर्वांग अगदीं होरपळून गेलें होतें, परंतु मोठ्या नशिबानें वांचला!

ता० ८ जानेवारी रोजीं दुर्जनसालानें इंग्रजी सेनापतीस निरोप पाठविला कीं, बलवंतसिंहास राज्यपद द्यावयास मी तयार आहें, तुम्हीं लढाई बंद करा. इंग्रजी सेनापतीनें उलट निरोप पाठविला कीं, बलवंतसिंहास राज्यपद दिल्यानें लढाई बंद होणें अशक्य आहे. जर तुम्ही स्वतः निमूटपणें आमच्या स्वाधीन व्हाल, तर पुढें लढाई बंद करण्याचा विचार होईल. अर्थातच हें म्हणणें दुर्जनसालास रुचलें नाहीं. याच दिवशीं, इंग्रजी सैन्यांत एक अत्यंत शोचनीय प्रकार घडून आला. एका

गाड्यांत २५० मण दारू होती, तो गाडा अकस्मात् मोडल्या-मुळें घर्षणानें अग्नि उत्पन्न होऊन दारू जळूं लागली व मोठा धडाका उडाला ! या धडाक्यानें कित्येक शिपाई व मजूर जागच्याजागीं भाजून मेले व पुष्कळ सामान निरुपयोगी झालें. इंग्रजांनीं तोफा व दारूगोळा ठेवण्याकरितां जो बुरूज उभारिला होता, त्याचा जाटांनीं अगदीं उच्छेद करून टाकिला. जाटांच्या एका सुरुंगाला इंग्रजांनीं आग लाविल्यामुळें बरेच जाट कामीं आले.

ता० ११ जानेवारी रोजीं सकाळीं, ८ वाजल्यापासून ९ वाजतपर्यंत खंदकावर एक लढाई झाली. जाट लोकांनीं इंग्रजी तोफखान्याच्या नजीकचें एक बळकट ठिकाण आपल्या ताब्यांत घेतलें होतें, त्यांस तेथून हांकून लावण्याकरितां कांहीं गोरे शिपाई पाठविण्यांत आले होते, परंतु बराच वेळ लढाई झाल्यावर, जाटांपुढें इंग्रजांचें कांहीं तेज न पडल्यामुळें त्यांस मागें पाय काढावा लागला. या युद्धांत इंग्रजी योद्धा कर्नल फेथफुल यास भयंकर जखमा झाल्या. दुसरे दिवशीं, जाट सैन्यांत भेद उत्पन्न करण्याकरितां कांहीं गोरे शिपाई पाठविण्यांत आले होते, परंतु त्यांस येतांना पाहून जाटांनीं आपल्या तोफा चालू केल्या-मुळें पुनः लढाई सुरू झाली. या लढाईत, इंग्रजी सैन्यानें आपल्या संगिनींचा उपयोग करून शेंकडों जाटांचा विध्वंस केला. या दिवशीं, दुर्जनसाल पळणार आहे, अशीही अफवा उठली होती; इंग्रजही सावध होते, परंतु ती अफवा शेवटीं अफवाच ठरली ! पुढें ता० १३ पासून ता० १६ पर्यंत, दोन्ही पक्षांच्या तोफा व बंदुका झडतच होत्या. या वेळीं, दोन्ही पक्ष अगदीं सारखे होते. इंग्रजांस शहरांत घुसतां येत नव्हतें व जाटांस त्यांस हांकून लावितां येत नव्हतें.

ता० १७ रोजीं, इंग्रजी सेनापतीस असें वाटलें कीं, आतां विनाकारण वेळ दवडण्यांत अर्थ नाहीं. आणखी एक दोन दिवस असाच प्रकार चालू राहिल्यास आपल्या सैन्याचे फार हाल होतील व प्राणरक्षणार्थ आपणास शेवटीं पळून जाणें भाग पडेल. तस्मात् आजच्या आज याचा कायतो सोक्षमोक्ष करून टाकावा हें बरें. असा विचार ठरल्यावर, दुसरे दिवशीं इंग्रजांनीं, शहरावर मोठ्या निकराचा हल्ला केला व ता० १८ रोजीं सकाळीं ते भरतपुरच्या तटास येऊन भिडले. किल्ल्याच्या ईशान्य दिशेस, इंग्रजांनीं तोफा ठेवण्याचा जो मोर्चा उभा केला होता, तिकडे जाऊन व तेथील सुरुंगांत दारू भरून इंग्रजी सैन्यानें त्यास आग लाविली. सुरुंग इतक्या जोरानें उडाला कीं, पांच सात जाट जागच्या जागीं मरून पडले व इंग्रजी सैन्यांतील शेंकडों लोक मेले व जखमी झाले. या वेळीं इंग्रज अगदीं घाबरून गेले, कारण, 'केलें तुला तें झालें मला' अशी त्यांची स्थिति झाली ! परंतु सेनापतीच्या उत्तेजक शब्दांनीं इंग्रजी शिपायांस पुनः मोठी वीरश्री चढली व ते दुप्पट जोरानें लढूं लागले. पूर्वींचा सेनापति घायाळ झाल्यामुळें सैन्याचें आधिपत्य कर्नल नेशन यास देण्यांत आलें होतें. परंतु तो तटाच्या सन्निध जाऊन पोंचतो न पोंचतो, तोंच तोही जखमी झाला ! सेनापतीची अशी अवस्था केल्यावर त्याच्या सेनेचें काय चालणार, अशीच जणूं काय जाटांची समजूत होती. या वेळीं कर्नल डिलामेन हा आपल्या हाताखालच्या सैन्यासहित तटाच्या खिंडारापाशीं येऊन मोठ्या साहसानें तटावर चढला! क्रमशः दुसरे इंग्रज शिपाईही तिकडे जमूं लागले. जाट मोठ्या शौर्यानें लढत होते. परंतु त्यांच्या माऱ्याची पर्वा न करितां इंग्रजी सैन्य फत्तेबुरुजापर्यंत जाऊन पोंहोंचलें व तटावर चढून अनेक शिपाई ठिकठिकाणीं उभे राहिले. ज्या फत्तेबुरुजानजीक, पूर्वींच्या युद्धांत इंग्रजांचा

मोड झाला होता, तो बुरुज आतां त्यांच्या हातीं आल्यामुळें त्यांस जयाची आशा उत्पन्न झाली.

इंग्रजी सैन्यानें याच वेळीं, 'गोपाळगड' या नांवाचें आणखी एक स्थान घेतलें व त्या सैन्याची एक तुकडी शहरांत घुसण्याचा प्रयत्न करूं लागली. इंग्रज अगदीं सन्निध आले असें पाहतांच, जाट सैन्य शहरांत पळूं लागलें. या वेळीं बहुतेक जाट शिपाई पळून गेले होते व फक्त ४,००० जाट इंग्रजांशीं अद्याप मोठ्या शौर्यानें लढत होते. मेजर हंटर हा इंग्रजी योद्धा या युद्धांत फार घायाळ झाला. तटाच्या दरवाजापाशीं इंग्रजी शिपायांनींही अनेक जाट मारिले. इंग्रज आतां शहर हस्तगत केल्याशिवाय राहत नाहींत अशी खात्री झाल्यावर, जाटांनीं त्यांस मोठ्या जोराचा प्रतिबंध केला, परंतु ईश्वरी इच्छा कांहीं निराळीच होती ! त्यामुळें जाटांच्या शौर्याचा कांहीं उपयोग न होतां शेवटीं इंग्रजांनीं भरतपुर शहर घेतलें !! अनेक जाट कैदी झाले. दुर्जनसालही रात्रीचा काळोखांतून पळून जात असतां इंग्रजांकडून पकडला गेला. दुर्जनसालाचे साहाय्यकर्ते कीर्त्तनराम व कीर्त्तनवल्लभ हे दोन्ही रजपूत योद्धे यापूर्वींच धारातीर्थीं पतन पावले होते. दुर्जनसालाचा मेहुणा व शूर जाट योद्धा खरसालसिंह याचीही तीच दशा झाली होती. इंग्रजांस फितूर झालेला जाट सरदार मधुसिंह हा सर्वस्वी इंग्रजांच्या स्वाधीन झाला व त्यांचें पेन्शन खात स्वस्थ बसला !

एकंदरींत, आत्मद्रोह हें सर्व नाशाचें मूळ आहे व त्यामुळेंच भरतपुरच्या प्रतापी राज्याचा स्वातंत्र्यचंद्र मावळला ! मागील युद्धांत ज्या भरतपुरकरांनीं जगद्विजयी इंग्रजांस चांगला हात दाखविला होता, तेच भरतपुरकर आतां आत्मद्रोहवश झाल्यामुळें

दुर्बळ होऊन त्याच इंग्रजांचे सर्वस्वी दासानुदास बनले ! एकटें भरतपुर जिंकल्यानें इंग्रजांचा एवढा फायदा झाला कीं, यानंतर दुसरे अनेक राजे त्यांस भराभर शरण येऊं लागले.

या युद्धांत ६० लोखंडी तोफा, ७३ पितळेच्या तोफा व अगणित द्रव्य इंग्रजांस मिळालें. या द्रव्यांतून, ४१ लक्ष ११ हजार ३५ रुपये १० आणे आणि ५ पै एवढी रकम इंग्रजांनीं आपल्या विजयी सैन्यास वांटून दिली ! भरतपुराकडील लोक असें सांगतात कीं, मोहोरांची लालूच दाखवून इंग्रजांनीं अनेक जाट वीरांस आपलेकडे वळवून घेतलें होतें, व याच कृत्याच्या जोरावर त्यांस जयप्राप्ति झाली. हिंदुस्थानांतल्या आलीकडच्या लढायांत जे पर्याय होत आले, तेच ह्या लढाईत झाले.

भरतपुरकरांचा असा समज होता कीं, जोंपर्यंत एक घड्याळमासा येऊन खंदकांतील पाणी शोषण करूं लागला नाहीं तोंपर्यंत भरतपुरचा किल्ला दुसऱ्यांच्या हातीं लागायाचा नाहीं. शेवटीं कोंबरमीर साहेबानें भरतपुर जिंकिलें तेव्हां, कोंबरमीर याचा कुम्भीर ह्मणजे घड्याळमासा असा अपभ्रंश करून, जाटांनीं आपल्या विधानाची सत्यता सिद्ध करून समजूत करून घेतली.

**समाप्त.**

# विक्रीस तयार.

| प्राकृत. | किं. | ट.हां. |
|---|---|---|
| चितुरगडचा वेढा. ह्यांत भाग ११ आहेत. ... ... | ·।≡ | ०- |
| छत्रपति संभाजी महाराज अथवा राजाचें दुष्कर्म राजाला भोवतें आणि प्रजेलाही भोवतें. ... ... | १। | ०= |
| ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती. भाग १ ला. | ·॥· | ०- |
| भाग २ रा. | ·॥· | ०- |
| गुजराथ देशाचा इतिहास. ह्यांत २९ विषय आहेत.... | १। | ०= |
| पृथ्वीराज चव्हाण. ... ... ... ... ... | ·।· | ०- |
| मराठ्यांची बखर. ... ... ... ... ... | १॥· | ०≡ |
| मराठ्यांच्या संबंधानें चार उद्गार. ... ... ... | १। | ०=॥ |
| मुसलमानी अमदानींतील मराठे सरदार. ... ... | ·।- | ०॥ |
| राजस्थानचा इतिहास. ... ... ... ... | २॥ | ०≡ |
| राजगुरु दादोजी कोंडदेव आणि छत्रपति शिवाजी महाराज. | ·।= | ०- |
| वसईचा मोहरा.... ... ... ... ... ... | ०=॥ | ०॥ |
| श्रीमंत पहिले बाजीराव बल्लाळ पेशवे यांचें चरित्र. ... | ·।· | ०- |
| हिंदुस्थानांतील दुष्काळ. ... ... ... ... | ·॥= | ०-॥ |
| सवाई माधवराव पेशवे. ... ... ... ... | ०≡ | ०- |
| हिंदुस्थानकथारस. ... ... ... ... ... | ·॥= | ०= |
| ग्लाडस्टन ह्यांचें चरित्र. ... ... ... ... | ·॥· | ०= |
| एब्राहाम लिंकन यांचें चरित्र.... ... ... ... | ·।· | ०- |
| विचाररत्न. ... ... ... ... ... ... | ·।- | ०- |
| स्वदेशाभिमान.... ... ... ... ... ... | ०= | ०॥ |
| मधुमक्षिका अथवा अनेक उपयुक्त व मनोरंजक विषयांचा संग्रह. ... ... ... ... ... ... | ·।· | ०- |
| विलक्षण गोष्टी अथवा आत्महत्येचा निवाडा. ... | १ | ०-॥ |

हीं पुस्तकें मुंबईंत निर्णयसागर छापखान्यांत विकत मिळतील.